बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर व साठवणे एजंसी जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१६ गोंदिया | अंक २७ | बुधवार, दि.१० ते १६ जून २०२६ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


# पटेलांच्या विश्वासू शिलेदाराला पक्षनिष्ठेचे फळ



**मी पक्षाचा निष्ठावान कार्यकर्ता आहे. आजवर पक्ष संघटन वाढविण्याकरिता सर्वोतपरी प्रयत्न केले. ही उमेदवारी म्हणजे पक्षासाठी केलेल्या कामाची ही पावती आहे.**

**राजेंद्र जैन**

**गोंदिया:-** राष्ट्रवादी काँग्रेसचे हेवीवेट नेते प्रफुल्ल पटेल यांचे निकवर्तीय आणि विश्वासू शिलेदार माजी आमदार राजेंद्र जैन यांना राज्यसभेची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. ही उमेदवारी म्हणजे आजवरच्या त्यांच्या पक्षनिष्ठेचे फळ असल्याचे मानले जात आहे. तर खासदार पटेल यांनी पक्षातील आपले वजन वापरत जैन यांच्यासाठी उमेदवारी मिळिवल्याचीही चर्चा आहे.राजेंद्र जैन यांचा राज्यसभेच्या उमेदवारीचा अर्ज भरला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते खासदार प्रफुल पटेल,खासदार पार्थ पवार,खासदार सुनील तटकरे,अन्न पुरवठा मंत्री छगन भुजबळ,मंत्री दिलीप वळसे पाटील ,गोंदियाचे पालकमंत्री ना.इंद्रनील नाईकजी,भाजपचे नेते व मंत्री आशिष शेलार,शिवसेनेचे मंत्री भरत गोगावले, आमदार समीर भुजबळ, आमदार संजय खोडके,आमदार राजकुमार बडोलें,आमदार राजूभाऊ कारेमोरे व महायुतीचे प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातील राजकीय व सहकार क्षेत्रातील नेते म्हणून राजेंद्र जैन यांची ओळख आहे. विधान परिषदेच्या भंडारा-गोंदिया स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून २००४ ते २०१६ अशा दोन टर्ममध्ये जैन हे आमदार म्हणून निवडून आले. भाजप नेते डॉ. परिणय फुके यांच्याकडून २०१६च्या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचा घटक पक्ष असल्याने उमेदवारीची आशा मावळली. या मतदारसंघातून भाजपचा उमेदवार निवडणूक लढवित आहे. यानंतरही जैन यांनी आपली पक्षावरील निष्ठा कायम ठेवली.

राजकीय क्षेत्रात कार्य करीत असतानाच गोंदिया शिक्षण संस्थेचा कारभारही ते सांभाळतात. गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या स्थापनेपासून आजतागत जैन हे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राज्य सचिव म्हणून त्यांनी काम केले. राष्ट्रीय पातळीवरही पक्ष संघटनवाढीसाठी त्यांनी कार्य केले. भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रफुल्ल पटेल यांच्यानंतरचे स्थान असलेले नेते म्हणूनही त्यांची ओळख आहे. नागपूर जिल्ह्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रभारीपदही त्यांना देण्यात आले होते. दरम्यान, जैन यांच्या नावाची घोषणा होताच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. पक्षाचा पुन्हा एक लोकप्रतिनिधी या जिल्ह्याला मिळाल्याने कामे आता अधिक वेगाने होतील असा सूर राष्ट्रवादीत उमटू लागला आहे.

## “आपके दो दो बेटे खासदार बन गये..”

**गोंदिया- राजेंद्र जैन यांची राज्यसभेसाठी निवड झाल्यानंतर राजकीय वतुर्ळात सुनील तटकरे आणि प्रफुल पटकरे या जोडगोळीच्या अजूनही कायम असलेल्या वर्चस्वाची चर्चा रंगली आहे. तर राजेंद्र जैन यांची राज्यसभेसाठी निवड झाल्यानंतर त्यांच्या राहत्या घरीही आनंदाच वातावरण असून आनंद व्यक्त केला जात आहे.ङ्गमाताजी आपके दो-दो बेटे खासदार बन गयेफअसं म्हणत प्रफुल पटेल यांच्या पत्नी वर्षा पटेल यांनी राजेंद्र जैन यांच्या आईला या संदर्भात गोड बातमी दिली आहे.**





## गोंदियात कार्यकर्त्यांकडून जल्लोष...

**गोंदिया : राज्यसभा सदस्यत्वाकरिता माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या नावाची अधिकृत घोषणा होताच सोमवारी (ता. ८) गोंदिया शहरात जल्लोष करण्यात आला. पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थकांनी फटाके फोडून, मिठाई वाटून आनंद साजरा केला. वर्षा पटेल यांनी राजेंद्र जैन यांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांचे अभिनंदन केले. मआपके दो दो बेटे खासदार बन गये..फअसे राजेंद्र जैन यांच्या आईला म्हणत आनंद व्यक्त केला**

# जिल्हाधिकारी-ओबीसी आंदोलकांतील दुसरी बैठकही निष्फळ

### ओबीसींचा स्वतंत्र कॉलम मिळेपर्यंत उपोषण व बहिष्कार मागे न घेण्याचा इशारा



**भंडारा:-** जिल्ह्यात सुरू असलेल्या जनगणना मोहिमेला ओबीसी समाजाकडून अल्प प्रतिसाद मिळत असल्याच्या पार्श्वभूमीवर, जिल्हाधिकारी सावनकुमार यांनी ८ जून रोजी दुपारी बोलावलेली ओबीसी पदाधिकाऱ्यांची आठ दिवसातील दुसरी विशेष बैठकही सकारात्मक तोडगा न निघाल्याने निष्फळ ठरली.

मजोपर्यंत आमच्या न्याय्य मागण्यांवर ठोस निर्णय होत नाही, तोपर्यंत आम्ही एक पाऊलही मागे हटणार नाहीफ, असा आक्रमक पवित्रा घेत ओबीसी संघर्ष समितीने आपला बहिष्कार कायम ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. ओबीसी समाजाच्या आक्रमक आणि एकजुटीच्या भूमिकेमुळे जिल्ह्यातील जनगणना मोहीम पूर्णपणे रेंगाळण्याची शक्यता निर्माण झाली असून, आता चेंडू थेट सरकारच्या कोर्टात गेला आहे.बैठकीला जिल्हाधिकाऱ्यांच्या महत्त्वपूर्ण बैठकीला सकल ओबीसी महामोर्चाचे मुख्य संयोजक उमेश कोर्राम, ओबीसी संघर्ष समितीचे मुख्य समन्वयक सदानंद ईलमे, प्रभाकर वैरागडे, भगिरथ धोटे, डॉ. बाळकृष्ण सार्वे, विष्णू जगणाडे, रोशन उरकुडे, पंजाब कारेमोरे, रमेश शहारे, साकुरे, रामरतन ईलमे, किसन शेंडे, अरुण लुटे, सुभाष पाल, ललिता देशमुख, शुभदा झंझाळ व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### आंदोलनाचा इशारा

**पुढील टप्प्यातील जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम (स्तंभ) समाविष्ट केला जात नाही, तोपर्यंत आमचे उपोषण आणि आंदोलन अधिक तीव्रतेने सुरूच राहील, असा इशारा यावेळी देण्यात आला.**

### मंत्र्यांच्या लेखी आश्वासनाशिवाय मागे हटणार नाही

**शासन जर आमचे ऐकत नसेल, तर आम्ही शासनाचे का म्हणून ऐकावे?, असा थेट सवाल या बैठकीत उपस्थित करण्यात आला. ओबीसी संघर्ष समितीने जिल्हाधिकाऱ्यांना स्पष्ट संदेश दिला की, जोपर्यंत सरकारच्या वतीने संबंधित मंत्री स्वतः उपोषणस्थळी येऊन लेखी आश्वासन देत नाहीत, तोपर्यंत जनगणनेवरील बहिष्कार मागे घेतला जाणार नाही**

**जिल्हाधिकाऱ्यांची विनंती पदाधिकाऱ्यांनी धुडकावली**

जिल्ह्यात जनगणनेची गती मंदावल्याने चिंता व्यक्त करत भंडारा जिल्हाधिकारी सावनकुमार यांनी ओबीसी पदाधिकाऱ्यांची तातडीची बैठक बोलावली होती. प्रशासनाला सहकार्य करा आणि जनगणना मोहीम सुरळीत होऊ द्या, अशी विनंती जिल्हाधिकाऱ्यांनी बैठकीत केली. तसेच पुढच्या टप्प्यात ओबीसींची जनगणना नक्की केली जाईल, असे आश्वासनही त्यांनी प्रशासनाच्या वतीने दिले. मात्र, केवळ पोकळ आश्वासनांवर विश्वास ठेवण्यास पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट नकार दिला. आंदोलन सुरूच राहणार आहे.

# रंगकाम करणाऱ्या नराधमाचा ७ वर्षीय चिमुकलीवर अत्याचार

**गडचिरोली** :चामोर्शी शहरात घराचे रंगकाम करणाऱ्या एका २५ वर्षीय युवकाने सात वर्षीय चिमुकलीवर अत्याचार केल्याची संतापजनक घटना घडली आहे. याप्रकरणी आरोपीला चामोर्शी पोलिसांनी अटक केली असून प्रज्वल सदाशिव भांडेकर असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित बालिकेच्या राहत्या घरात सध्या रंगकामाचे काम सुरू आहे. नेहमीप्रमाणे ही सात वर्षांची बालिका घराच्या गच्चीवर खेळत होती. यावेळी तिथे रंगकाम करत असलेल्या प्रज्वल याने आजूबाजूला कोणीही नसल्याची संधी साधली तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. घटनेनंतर पीडित बालिकेला शारीरिक त्रास होऊ लागल्याने कुटुंबीयांच्या मनात संशय आला. त्यांनी तात्काळ तिला वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात नेले. वैद्यकीय अहवालात बालिकेवर अत्याचार झाल्याचे स्पष्ट होताच कुटुंबीयांना धक्काच बसला. पीडितेच्या मातेने तक्रार नोंदवताच पोलिसांनी गुन्ह्याची नोंद करून आरोपीला तात्काळ अटक केली आहे. या घटनेने बालकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, नराधमाला कठोर शिक्षा करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.घराचे रंगकाम करण्यासाठी आलेल्या एका २५ वर्षीय नराधमाने अवघ्या ७ वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. या गंभीर प्रकरणी चामोर्शी पोलिसांनी तत्परता दाखवत आरोपीला तात्काळ अटक केली आहे. प्रज्वल सदाशिव भांडेकर (वय २५) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. या घटनेमुळे संपूर्ण गडचिरोली जिल्ह्यात तीव्र संताप व्यक्त होत असून बालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, पीडित ७ वर्षीय बालिकेच्या राहत्या घरात सध्या रंगकामाचे काम सुरू आहे. आरोपी प्रज्वल भांडेकर हा तिथे रंगकाम करणारा मजूर म्हणून काम करत होता. घटनेच्या दिवशी ही चिमुकली नेहमीप्रमाणे आपल्या घराच्या गच्चीवर (टेरेस) खेळत होती. यावेळी गच्चीवर रंगकाम करत असलेल्या प्रज्वल याने आजूबाजूला कोणीही नसल्याची संधी साधली आणि चिमुकलीला गाठून तिच्यावर क्रूरपणे लैंगिक अत्याचार केला.या धक्कादायक घटनेनंतर पीडित चिमुकलीला प्रचंड शारीरिक त्रास होऊ लागला. मुलीची बदललेली प्रकृती आणि तिला होणारा त्रास पाहून कुटुंबीयांच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. त्यांनी वेळ न घालवता चिमुकलीला तातडीने वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात नेले.

# जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचा भोंगळ कारभार

**गोंदिया:-** केंद्र पुरस्कृत योजनांच्या अंमलबजावणीकरिता जिल्हा स्तरावर सुरु करण्यात आलेल्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचा भोंगळ कारभार जिल्हा परिषद सदस्य संजय टेंभरे यांनी उघड केला असून अनेक लेखाशिर्षात झालेला आर्थिक व्यवहार संशयास्पद असल्याचे म्हटले आहे. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेतील योजनांच्या अंमलबजावणीकरिता जिल्हा स्तरावर गठित करावयाच्या समितीची स्थापना सुद्धा करण्यात आली नसल्याचे समोर आले आहे. त्यातच केंद्र सरकार व राज्य सरकारच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीकरिता असलेल्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व उमेद प्रकल्पाच्या वेगवेगळ्या लेखाशिर्षामध्ये अंदाजे १५० कोटी रुपयांचा आर्थिक व्यवहार झाला असून हा आर्थिक व्यवहार संशयास्पद असल्याचे जि.प.सदस्य टेंभरे यांनी म्हटले आहे.

सन २०२२-२३,२०२३-२४,२०२४-२५,२०२५-२६ व २०२६-२७ या आर्थिक वर्षांगर्तंत झालेल्या आर्थिक व्यवहाराची चौकशी करण्याची मागणी सुद्धा केली आहे. केंद्र सरकारने नाव बदल केलेल्या रोजगार हमी योजनेच्या प्रचार प्रसिद्धीसाठी जिल्ह्यातील बचत गटांना प्रसिद्धी पत्रक वाटप करण्याचे निर्देश जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेला दिलेले होते. त्या निर्देशाअंतर्गत गोंदिया येथील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व उमेदच्यावतीने जिल्ह्यातील महिला बचत गटांना २ लाख पत्रके वाटप करण्यात आल्याचे दाखवून सुमारे १४ लाख रुपयाचा निधी खर्च झाल्याचे दाखविण्यात आले. जेव्हा की जि.प.सदस्य टेंभरे यांनी केलेल्या तपासणी दरम्यान अनेक महिला बचत गटांना सदर पत्रक प्राप्तच झाले नसल्याचे दिसून आले. सोबतच जिल्ह्यातील २० हजार महिला बचत गटापैकी कार्यरत नसलेल्या अनेक महिला बचत गटांच्या नावावर शासकीय योजनेचे कर्ज मंजूर झाल्याचे दाखविण्यात आले आहे.

तर या कार्यालयांतर्गत ५ खासगी वाहने भाड्याने घेत त्यातूनही निधीचा अपहार केला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. गोंदिया जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व उमेद योजनेतील प्रमुखांची सखोल चौकशी व्हावी याकरिता ग्रामविकास मंत्रालयाकडे तक्रार करुन उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा विचार टेंभरे यांनी व्यक्त केला आहे.

# किमान १५ जूनपर्यंत राज्यात सर्वत्र मान्सूनच्या पावसाची शक्यता कमी

### मान्सून कोकणात दाखल झाला, पण सर्वदूर सक्रिय नाही; शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये

**मुंबई:-**मान्सून दक्षिण कोकणात दाखल झाला असून किमान १५ जूनपर्यंत राज्यातील पावसाचा एकंदरीत जोर तसेच मान्सूनच्या प्रगतीचा वेग कमी होण्याची शक्यता हवामानाच्या सध्याच्या अंदाजातून दिसून येत आहे. त्यामुळे या कालावधीत राज्यात सर्वत्र समाधानकारक पावसाची शक्यता कमी आहे.सध्याच्या हवामान अंदाजानुसार किमान १५ जूनपर्यंत विदर्भ, मराठवाडा, खानदेश, आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये दुपारनंतर ढग आणि विखुरलेल्या स्वरूपाचा मेघगर्जनेसह वादळी पाऊस पडण्याची शक्यता आहे. तथापि, हा पाऊस व्यापक क्षेत्रात पेरणीस पोषक ठरेल, अशी परिस्थिती अद्याप दिसत नाही.

दरम्यान, किमान १२ जूनपर्यंत राज्यातील अनेक भागांमध्ये कमाल तापमान सध्याप्रमाणेच उच्च राहण्याची शक्यता आहे. विदर्भ व खानदेशात कमाल तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक, तर मराठवाड्यात ३५ ते ४० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याचा अंदाज आहे.

# पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना न्याय कधी?

- **पेन्शन, सेवाज्येष्ठता आणि नियमितीकरणाचा प्रश्न रखडला**
- **शासनाच्या उदासीनतेवर संताप**

**गोंदिया:-**राज्यातील शेकडो पदवीधर अंशकालीन कर्मचारी स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण करून शासनाच्या विविध आस्थापनांवर सेवा बजावत आहेत. मात्र या कर्मचाऱ्यांच्या भवितव्याचा प्रश्न आजही अधांतरी असून, सेवा बजावूनही त्यांना पेन्शन, सेवाज्येष्ठता आणि नियमितीकरणाचा लाभ मिळत नसल्याने शासनाच्या धोरणावर तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. प्रशासनाच्या दिरंगाईमुळे कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष वाढत असून, ङ्गन्याय मिळणार तरी कधी?ङ्क असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

सुशिक्षित बेरोजगार योजनेअंतर्गत शासनाच्या विविध आस्थापनांवर तीन वर्षे ३०० रुपये मासिक मानधनावर काम केलेल्या पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांनी दोन दशक शासनाशी लढा दिला. यानंतर शासनाने सन २०१९ मध्ये विविध शासकीय आस्थापनावरील रिक्त पदांच्या १० टक्के जागा समांतर आरक्षणानुसार पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांसाठी राखीव ठेवल्या. वयाची पंचेचाळीशी, पन्नाशीनंतर कर्मचाऱ्यांनी स्पर्धा परीक्षेला सामोरे जात गुणवत्तेच्या आधारे विविध शासकीय आस्थापनांवर नोकरी मिळवली. दीर्घ संघर्ष आणि अनेक वर्षानंतर अंशकालीन कर्मचाऱ्यांना नियमित सेवेची संधी मिळाली. मात्र सेवा, वयोमर्यादा आणि इतर तांत्रिक कारणांमुळे पेन्शनसह विविध सेवानिवृत्ती लाभांपासून या कर्मचाऱ्यांना वंचित राहावे लागत आहे.

संघटनेतर्फे या प्रश्नावर आंदोलने, उपोषणे, मोर्चे आणि निवेदने देण्यात आली. तरीही शासनाने ठोस निर्णय न घेतल्याने कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे. वारंवार आश्वासने देऊनही प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही न झाल्याचा आरोप कर्मचारी संघटनांकडून केला जात आहे.

दरम्यान, प्रकरण न्यायालयात पोहोचल्यानंतर शासनाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. न्यायालयाने संबंधित विभागांना निर्णय घेण्याबाबत निर्देश दिल्याने आता शासनाची भूमिका काय असणार, याकडे कर्मचाऱ्यांचे डोळे लागले आहेत. मात्र न्यायालयीन निर्देशानंतरही विलंब झाल्यास प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण होणार आहे.

कर्मचारी संघटनांची प्रमुख मागणी म्हणजे २००५ पूर्वीची सेवा पूर्णवेळ सेवेसमान ग्राह्य धरणे, नियमितीकरण करणे आणि जुन्या पेन्शन योजनेचा लाभ देणे. या मागण्यांवर शासनाने अद्याप अंतिम निर्णय घेतलेला नसल्याने शेकडो पदवीधर अंशकाली कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांचे भविष्य अनिश्चिततेत आहे. गोंदिया जिल्ह्यासह राज्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांनीही शासनाने तातडीने निर्णय घेऊन पेन्शन, सेवाज्येष्ठता आणि नियमितीकरणाचा प्रश्न मार्गी लावावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या या प्रश्नावर आता शासनाने केवळ आश्वासनांऐवजी ठोस निर्णय घेण्याची वेळ आल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

**अनेक वर्षांपासून मागण्यांवर निर्णय न झाल्याने संघटनेने न्यायालयाचा मार्ग स्वीकारला. २४ एप्रिल २०२६ रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात सुनावणी झाली. न्यायालयाने यावर १२ आठवड्यांत निर्णय घेण्याचे राज्याचे मुख्यसचिव व संबंधितांना निर्देश दिले आहेत. शासनाने धोरणात्मक निर्णय घेत शासन सेवेत लागलेल्या पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना दिलासा घ्यावा.**

**भिवराम रहांगडाले, पं.अं. कर्मचारी चिखली**

**हजेरी सहायकाप्रमाणे सन २००५ पूर्वीची तीन वर्षांची सेवा मान्य करुन नियमितीकरण करावे. महाराष्ट्र नागरीसेवा (निवृत्ती वेतन) नियम, १९८२ प्रमाणे जुनी पेन्शन योजना (ओपीएस) लागू करावी आणि निवृत्तीचे वय ५८ ऐवजी ६० वर्ष करावे.**

**अजय कुमार कोटांगले, पं.अं. कर्मचारी, तिरोडा**




# नक्षलोत्तर परिवर्तनासंदर्भातील राज्यस्तरीय आढावा बैठक



**गडचिरोली :-** सुरक्षा यंत्रणांनी नक्षलवाद्यांना मागे हटण्यास भाग पाडल्यानंतर आता त्या भागात निर्माण झालेली प्रशासकीय पोकळी नागरी प्रशासनाने प्रभावी सेवा, विकासकामे आणि जनसंपर्कातून भरून काढणे आवश्यक आहे. येत्या दहा वर्षांत गडचिरोलीचा चेहरामोहरा बदलण्याची ऐतिहासिक संधी उपलब्ध असून प्रशासनाने लोककेंद्रित दृष्टिकोन स्वीकारत आदिवासी समाजाचा विश्वास जिंकण्यावर भर द्यावा, असे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी गडचिरोली येथे मार्गदर्शन करताना सांगितले.

महाराष्ट्रातील नक्षलवादग्रस्त जिल्ह्यांच्या नक्षलोत्तर परिवर्तनासंदर्भातील राज्यस्तरीय आढावा बैठक आज गडचिरोली येथे राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली आणि पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. नक्षलवादाच्या खात्म्यानंतर दुर्गम भागांमध्ये विकास, प्रशासन आणि मूलभूत सेवांचा प्रभावी विस्तार करून नागरिकांचा शासनावरील विश्वास अधिक दृढ करण्यासाठी बैठकीत विविध महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. बैठकीस राज्य गुप्तवार्ता विभागाचे आयुक्त शिरीष जैन, अपर पोलीस महासंचालक छेरिंग दोरजे, पोलीस महानिरीक्षक संदीप पाटील, विभागीय अपर आयुक्त माधवी खोडे, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, गोंदियाचे जिल्हाधिकारी डॉ. मंगेश गोंदावले, जिल्हा पोलीस अधीक्षक एम रमेश व इतर संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्य सचिव पुढे म्हणाले की, जंगलातील संसाधनांचे खरे मालक आदिवासी नागरिक असून वन विभाग आणि नागरी प्रशासनाने मालक म्हणून नव्हे तर ङ्गसुलभकफ म्हणून काम करावे. नागरिकांच्या गरजा समजून घेत संवेदनशीलतेने सेवा दिल्यास शासन आणि समाज यांच्यातील दरी आणखी कमी होईल.

बैठकीच्या प्रारंभी जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी गडचिरोली जिल्ह्याच्या नक्षलोत्तर परिवर्तन आराखड्याचे सादरीकरण केले. गोंदियाचे जिल्हाधिकारी डॉ. मंगेश गोंदावले यांनी गोंदिया जिल्ह्याचा आढावा मांडला, तर जिल्हा पोलीस अधीक्षक एम. रमेश यांनी सुरक्षा परिस्थिती आणि विकासात्मक उपक्रमांची माहिती सादर केली.बैठकीला जिल्हा नागपूर, गोंदिया आणि गडचिरोली येथील वरिष्ठ प्रशासकीय व पोलीस अधिकारी उपस्थित होते.

### स्थानिक युवकांना कौशल्य प्रशिक्षणाची गरज

गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर औद्योगिक गुंतवणूक, स्टील प्रकल्प, रेल्वे, विमानतळ आणि इतर पायाभूत सुविधा प्रकल्प सुरू होत आहेत. या संधींचा लाभ स्थानिक युवकांना मिळावा यासाठी व्यापक कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्याच्या सूचना मुख्य सचिवांनी दिल्या. अन्यथा उच्च पदांवर बाहेरील मनुष्यबळ येईल आणि स्थानिक युवकांना मर्यादित रोजगार मिळेल, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली.

### रेल्वे, महामार्ग आणि खाण प्रकल्पांना गती

सव्वाशे वर्षांच्या प्रतीक्षेनंतर गडचिरोलीत रेल्वे पोहोचत असून समृद्धी महामार्गाचा विस्तार नागपूर, चंद्रपूर, गोंदिया आणि गडचिरोलीपर्यंत करण्यास शासनाने मान्यता दिल्याचे त्यांनी सांगितले. खाण प्रकल्पांच्या मंजुरी आणि जमीन संपादन प्रक्रिया कायदेशीर चौकटीत राहून वेगाने पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

### दिवसा वीजपुरवठा आणि सौरऊर्जेवर भर

शेतकऱ्यांना रात्री शेतात जावे लागू नये यासाठी दिवसा वीजपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी वीज वितरण यंत्रणा सक्षम करण्याच्या सूचना देण्यात आल्या. जिल्ह्यातील ३३ हजार कृषी पंपांचे सौरऊर्जीकरण सुलभ करण्यासाठी अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पुढाकार घेऊन सेवा द्यावी, असेही त्यांनी सांगितले.

### मोहा, बांबू आणि तेंदूपत्त्यातून उत्पन्नवाढ

मोहा संकलनासाठी आधुनिक जाळी तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे, वन धन केंद्रांद्वारे साठवण सुविधा उपलब्ध करणे आणि बांबू व तेंदूपत्ता आधारित मूल्यवर्धन उद्योगांना चालना देण्यावरही बैठकीत भर देण्यात आला.

### नक्षलवादाविरोधातील लढ्याला ऐतिहासिक यश : सदानंद दाते

**पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी गेल्या तीन दशकांतील नक्षलविरोधी लढ्याचा आढावा घेताना सांगितले की, १९८० पासून सुरू असलेल्या सशस्त्र चळवळीला निर्णायक धक्का देण्यात सुरक्षा दलांना यश आले आहे. हा भारतीय लोकशाहीचा आणि संविधानिक व्यवस्थेचा मोठा विजय असल्याचे त्यांनी नमूद केले.या संघर्षात महाराष्ट्रातील २४४ पोलीस जवान आणि ६०९ नागरिकांनी बलिदान दिल्याची माहिती त्यांनी दिली.**

### “सी-६०’ मधून एलिट फोर्सची निर्मिती

**सी-६० दलातील निवडक जवानांमधून अत्याधुनिक प्रशिक्षणप्राप्त विशेष ङ्गएलिट फोर्सफतयार करण्यात येत असून त्याचा उपयोग राज्य व देशपातळीवरील विशेष मोहिमांसाठी केला जाईल. उर्वरित जवानांना शिक्षण आणि कौशल्यविकासाच्या माध्यमातून नव्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.**

### शहीदांच्या स्मृतीसाठी “लिव्हिंग मेमोरियल’

**नक्षलवादाविरोधातील संघर्षाचा इतिहास जतन करण्यासाठी गडचिरोली येथे अत्याधुनिक ङ्गलिव्हिंग मेमोरियलफआणि संग्रहालय उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याची माहिती त्यांनी दिली. या स्मारकातून शहीद जवानांच्या बलिदानाची प्रेरणा भावी पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.**

## संपादकीय

# शेतकरी सज्ज पण मान्सूनची अनिश्चितता

मशागतीची कामे पूर्ण करून शेतकरी पेरणीसाठी सज्ज आहे; मात्र आकाशाकडे लागलेल्या नजरा आणि पावसाची अनिश्चितता यामुळे चिंता वाढत आहे. दुसरीकडे वाढती पाणीटंचाई आणि उन्हाची तीव्रत हाल वाढवत आहे.

जून महिना सुरू होऊन आज सहावा दिवस उजाडला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार मान्सून केरळमध्ये दाखल झाला असून कर्नाटकातही त्याचे आगमन झाले आहे. तसेच दोन दिवसांपूर्वी सिंधुदुर्ग जिल्ह्यातही पावसाने हजेरी लावली आहे. आता १५ जूनपर्यंत राज्याच्या इतर भागांतही मान्सून दाखल होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. असे असले तरी राज्यातील शेतकरी राजा अजूनही आकाशाकडे डोळे लावून पावसाची आतुरतेने वाट पाहत आहे. अधूनमधून ढग दाटून येत असून पाऊस येण्याचे संकेत मिळत आहेत; मात्र त्याबाबत निश्चितता नाही. परिणामी नागरिकांना कडक उन्हाचा सामना करावा लागत आहे.महत्त्वाची बाब म्हणजे, शेतकऱ्यांनी शेतातील मशागतीची कामे पूर्ण केली असूनही पावसाअभावी बियाण्यांची पेरणी रखडली आहे. त्यामुळे शेतकरी चिंतेत असून त्याची ही चिंता दूर करण्यासाठी पावसाचे दमदार आगमन होणे अत्यंत गरजेचे आहे. याचबरोबर अनेक भागांत पाणीटंचाईची समस्या गंभीर होत चालली आहे. गावांमध्ये शासकीय नळयोजना असली तरी एक दिवसाआड केवळ अर्धा तास पाणीपुरवठा होत आहे. काही ठिकाणी संबंधित कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे सात–आठ दिवस सार्वजनिक नळांना पाणी आलेले नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिक आणि शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत.

मागील वर्षी याच काळात शेतकऱ्यांची लावणी सुरू झाली होती; मात्र नंतर पावसाने दडी मारल्याने अनेकांचे नुकसान झाले. यंदा मात्र त्याउलट परिस्थिती पाहायला मिळत आहे. त्यामुळे शासनाने चार–पाच वर्षांनी कर्जमाफी जाहीर करण्याऐवजी प्रत्येक आर्थिक वर्षात नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे सर्वेक्षण करून तातडीने नुकसानभरपाई देण्याची प्रभावी यंत्रणा विकसित करावी.अशा प्रकारे वेळेवर मदत मिळाल्यास शेतकऱ्यांना दिलासा मिळेल आणि सरकारी तिजोरी–वरही अतिरिक्त भार पडणार नाही. तसेच शेती क्षेत्रातील समस्यांवर दीर्घकालीन आणि परिणामकारक उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. कारण शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून खऱ्या अर्थाने तोच देशाचा अन्नदाता आणि राजा आहे. शासनाच्या नवीन धोरणानुसार रुपये २५ हजारांपेक्षा जास्त वेतन असलेल्या व्यक्ती, आयकर भरणारे नागरिक तसेच सरकारी नोकरीतील कर्मचाऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार नाही. हे धोरण योग्य असले तरी नैसर्गिक आपत्ती किंवा अन्य कारणांमुळे नुकसानग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळणे अत्यंत आवश्यक आहे.

दुर्दैवाने अनेक ठिकाणी ही मदत वेळेवर पोहोचत नाही. अशा परिस्थितीत ज्या ठिकाणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांपर्यंत मदत वेळेत पोहोचलेली नसेल, तेथील संबंधित अधिकाऱ्यांवर तत्काळ कारवाई करण्यात यावी.त्यामुळे शेतकऱ्यांना न्याय मिळण्यास मदत होईल. याच आनुषंगाने, "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" योजनेप्रमाणेच "मुख्यमंत्री लाडके शेतकरी" ही योजना सुरू करण्यात यावी. शेतकऱ्यांसाठी आधीच अनेक योजना उपलब्ध आहेत, मग नव्या योजनेची गरज काय, असा प्रश्न अनेकांना पडू शकतो; परंतु जर विद्यमान योजना पुरेशा आणि प्रभावी असतील, तर शेतकऱ्यांवर आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलण्याची वेळ का येते? शेतकरी आत्महत्यांची कारणे शोधण्यासाठी जवळपास १५ लाख रुपये खर्च करून अहवाल तयार करण्यात आला. तरी देखील शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण कमी झालेले दिसून येत नाही. ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. भारत हा कृषिप्रधान देश असून देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतकऱ्यांचे संरक्षण आणि सक्षमीकरण करणे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षितता, वेळेवर मदत, योग्य मोबदला आणि संकटाच्या काळात त्वरित आधार मिळावा यासाठी "मुख्यमंत्री लाडके शेतकरी" योजनेसारखे स्वतंत्र आणि प्रभावी उपक्रम राबविण्याची आज नितांत गरज आहे.

शेती हे भारतातील बहुसंख्य लोकांच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन असून भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रभावी उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. महागाई निर्देशांकाचा विचार करून राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये शेतकऱ्यांसाठी विशेष "खते खाते" सुरू करण्यात यावे व त्यात नियमित आर्थिक सहाय्य जमा करण्यात यावे. यामुळे शेतीसाठी आवश्यक खते व इतर साहित्य खरेदी करणे सुलभ होईल आणि शेतकऱ्यांवरील आर्थिक ताण कमी होण्यास मदत मिळेल. तसेच नैसर्गिक आपत्तींचा सर्वाधिक परिणाम शेतकरी वर्गावर होत असल्याने अशा परिस्थितीतही वेळेवर आर्थिक मदत उपलब्ध होणे आवश्यक आहे. या उपायांमुळे शेती क्षेत्र अधिक सक्षम होऊन राज्याच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळू शकेल. अजूनही राज्यात मान्सूनचे आगमन झालेले नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत. पेरणीनंतर पुरेसा पाऊस न झाल्यास पिकांच्या वाढीवर परिणाम होऊन उत्पादन घटू शकते. त्यामुळे शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. हवामानातील बदल, ढगांची स्थिती आणि वाऱ्याचा वेग यावर शासनाकडून लक्ष ठेवले जात असून ही माहिती विविध माध्यमांतून दिली जाते. शेती हंगामात शेतकऱ्यांना अचूक व वेळेवर हवामानविषयक माहिती मिळणे आवश्यक आहे.

कृषी विभाग आणि हवामान विभागाने नियमित मार्गदर्शन करून संभाव्य धोके व बदलांची माहिती तातडीने द्यावी. मोबाईल व डिजिटल माध्यमांमुळे ही माहिती जलद पोहोचू शकते. पावसाच्या आगमनाला काहीसा विलंब होत असला तरी अनेकदा अनुभवाच्या जोरावर शेतकऱ्यांचे अंदाजही अचूक ठरतात. संभाव्य नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी स्थानिक परिस्थितीनुसार योग्य पिके आणि बियाण्यांची निवड करून पेरणी करावी. सध्या शेतकरी राजा पावसाच्या प्रतीक्षेत असला तरी लवकरच राज्यात मान्सूनचे आगमन होईल आणि शेतकरी नव्या उत्साहाने शेती हंगामाच्या कामांना सुरुवात करतील, अशी अपेक्षा आहे.

# चळवळीचं स्पॉन्सरशिप धोक्याचं!

गुलामीतून मुक्त व्हायचे असेल तर ज्यांच्यापासून आपल्याला मुक्तता हवी त्यांचा आधार घेऊन किंवा त्यांच्या आश्रीत राहून होता येत नाही. गुलामाला इच्छा – आकांशा नसतात. त्याला स्वतंत्रपणे आणि आपल्या ताकदीवर उभे राहावे लागते. स्वाभिमानी आणि शत्रू–मित्राची ओळख असणाऱ्याला मात्र ते शक्य आहे. त्यासाठी त्याला सर्वस्व बहाल करावे लागते. जगातल्या क्रांत्या आपल्यातील गुलामीची जाणीव झालेल्या लोकांनीच केल्या. अमेरिकेतील काळा–गोरा (वंशवाद) संघर्ष, फ्रेंच राज्यक्रांतीचा इतिहास, जपानच्या दोन समूहातील संघर्ष आम्हाला ठाऊक आहे. संघर्षात गोऱ्या लोकांनी काळ्या लोकांना साथ दिली. काही देशात आंदोलनकर्त्यांना मानवी मूल्यांच्या आधारावर स्वकियांशी विद्रोह केला. भारतात मात्र तसे झाले नाही. भारतात शूद्र अतिशूद्र–शेटजी भटजीच्या लढायीत ब्राह्मणांनी शूद्र अतिशूद्राला साथ दिली. नाही.तशी अपेक्षा करणे मूर्खपणाचे आहे. ते त्यांना शक्यही नव्हते. भारतात बुद्धाने केलेली सामाजिक क्रांती, संत रैदास–कबीरांचे आंदोलन किंवा आधुनिक भारतात राष्ट्रपिता ज्योतिबा फुले, शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समग्र क्रांतिकारी आंदोलन स्वाभिमानाचे मानवी अधिकाराचे आंदोलन होते. या बहुजन नायक–नायीकांनी ज्यांच्या विरोधात चळवळ केली त्यांची साथ घेतली नाही. त्यांनी स्वतःचे साधन–संसाधन निर्माण केलेत. ते लढले आणि जिंकलेत सुद्धा! आम्ही अनुयायी म्हणून या स्वाभिमानी चळवळ चालवण्यात किती यशस्वी झालोत, याची समीक्षा करण्याची ही वेळ आहे.

जागतिकिरणाने स्पर्धा निर्माण केली आहे. या स्पर्धेत टिकायचे असेल, तर तुमच्याकडे उपलब्ध असलेल्या घटकांबरोबर इतर बाबींची साथ घ्यावी लागते,ही मान्यता कोणीही नाकारू शकणार नाही.मात्र हे करत असताना तुमच्या ती अटीवर नसेल तर मग परत नव्या प्रकारची गुलामी ओढून घेतल्यासारखे होईल. ही बाब सर्वच क्षेत्रात लागू आहे.आज आम्ही नव्या गुलामीसाठी रेड कार्पेट अंथरत तर नाही ना? असा प्रश्न पडतो. कोणतीही गोष्ट करायची असेल अगदी मोहल्यातल्या एखाद्या पंगतीला आम्ही स्पॉन्सर्स शोधतो आणि तोही कोण ? तर ज्याने आम्हाला शेकडो वर्षापासून सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि शैक्षणिक गुलाम केले!

नागपूर हे चळवळीचे केंद्र आहे. अशी जगात नागपूरची मान्यता आहे आणि ते खरेही आहे. नागाच्या या नागभूमीला केंद्रस्थानी ठेवून डॉ.बाबासाहेबांनी १९२० पासून ते १९५६ पर्यंत स्वाभिमानाची लढायी लढली. त्यासाठी तितक्याच स्वाभिमानाने अशिक्षित परंतु प्रामाणिक लोकांनी बाबासाहेबांना साथ दिली. पै –पै जमा करून चळवळ जिवंत ठेवली. दीक्षा समारंभात जमा झालेल्या पैशाच्या तपशीलावरून आणि खर्चावरून याची कल्पना येते. या महान कार्यासाठी बाबासाहेबांनी इतर कोणाचीही मदत घेतली नाही. कार्यकर्त्यांनी सुद्धा कोणी स्पॉन्सर शोधला नाही. आज मात्र दीक्षाभूमीचे (काही अपवाद) बहुतांश कार्यक्रम स्पॉन्सरशिवाय चालत नाहीत. याचा परिणाम शेवटी असा झाला. शहराशहरात निर्माण झालेल्या विहारांसाठी स्पॉन्सर शोधल्या जावू लागले. मग कोणाकडून बुद्ध मूर्ती, कोणाकडून वाल कंपाउंड बांधण्यासाठी नगर–सेवक–खासदारांना साकडे घातले जावू लागले. 'जो देता है वह इश–ारा भी करता है' या वास्तविकतेची प्रचिती यायला लागते. अशा कित्येक विहाराला राजकीय नेत्यांच्या बॅनरने झाकल्याचे आम्ही उघड्या डोळ्यांनी बघतो. नितीन गडकरीकडून दरवर्षी धम्म परिषदांचे भव्य आणि दिव्य आयोजन होते.एका ब्राह्मणाला बौद्ध धर्म वाढावा, असे आम्हाला वाटत असेल तर त्याला मानसिक दिवाळखोरी म्हणावी की शुद्ध बेईमानी! आज गावागावात हिच परिस्थिती आहे.

समस्त बहुजन समाज अशाच मानसिकतेने ग्रासलेला आहे. अनुसूचित जाती–जमाती आणि ओबीसीमध्ये निर्माण झा–लेले तथाकथित नेते आपल्या जातीत आरएसएसचा छुपा अजेंडा खुलेआम राबवत आहेत. त्यांची भाषा –देहबोली बघता ते किती मग्रूर आहेत, हे दिसून येते. समाजाला चालवण्याचा ठेका जणू आपल्याला मिळाला,अशी त्याची कृती असते. बहुजन महापुरुषांबरोबर रामकथा, हनुमान जयंतीचा जल्लोष करायला तो अग्रणी असतो. त्यासाठी आमदार – खासदारांकडून निधीची व्यवस्थाही केली जाते. अशा कामाला नेते न सांगता मदत करतात. त्यांचा डोळा मतावर असतो. नेते– कार्यकर्ते मात्र साहेबांनी मदत केली म्हणून खुष असतात. गुलाल उधळतात. खाणे पिणे होते. अलीकडे जाती जातीची संमेलने होवू लागली आहेत,त्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ब्राह्मण नेते – मंत्र्याला बोलवले जाते.कारण तोच त्या संमेलनाचा स्पॉन्सर असतो. पैशाची कमी नसते.

राजकीय परिस्थिती यापेक्षा बिकट आहे. ७५ वर्षे काँग्रेस आणि भाजपने काही केले नाही, हे माहित असूनही भाजपला सत्तेपासून रोखण्यासाठी आमच्यातील स्वयंघोषित विद्वान काँग्रेसाला साथ देण्याचे अपील करतात. स्वतः भाजप–काँग्रेस पक्षांना पर्याय न देता त्यांच्यासमोर लोटांगण घा–लतात. फुले–आंबेडकरांचे नाव घेणारे कितीतरी पक्ष भाजप–काँग्रेस पुरस्कृत आहेत. विशेष म्हणजे ही बाब सगळ्यांनाच माहित आहे.

बुद्धाचा कार्यकारणभाव सांगतो की कोणतीही कृती वा घटना घडते त्याला निश्चित असे कारण असते. आपल्या परवलंबित्वाची सुद्धा अनेक कारणे आहेत. अज्ञान, शत्रू–मित्राची ओळख, आंदोलनाबाबत अनास्था सारखी अशी कितीतरी करणे सांगता येतील.लोकांना आपल्या हयातीत सर्व पाहिजे.परंतु क्रांती एका दिवसात होणारी घटना किंवा कृती नाही. याची जाणीव त्यांना नाही. लोक आपला उत्कर्ष दुसऱ्याच्या प्रयत्नातून करू पाहतात.अशा वेळी ते ना समाजाचा विचार करत ना त्यांना स्वाभिमानाशी काही देणे घेणे असते.

स्वाभिमानाला प्राधान्य देवून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आ–पले समग्र आंदोलन चालवले. जेथे माणसाचे माणुसपण नाकारले जाते त्या हिंदु धर्माच्या (ब्राह्मणी धर्म) ठेकेदारांना त्यांनी अनेक प्रश्न केलेत. अशा वेळी आपल्या लोकांनाही त्यांनी सावध केले. वेळ प्रसंगी कान सुद्धा पिळलेत. त्यांना एक आदर्श समाज निर्माण करायचा होता. त्यासाठी त्यांनी आपले सर्वस्व पनाला लावले. जाती व्यवस्था कायम ठेवून ते करणे शक्य नव्हते. त्यासाठी त्यांच्या अनुयायांनी जीवाची बाजी लावावी अशी त्यांची अपेक्षा होती. १७ आगस्ट १९५२ ला



त्यांनीच स्थापित केलेल्या सिद्धार्थ महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित केलेल्या कार्यक्रमात बाबासाहेब म्हणतात, "अस्पृश्यांच्या उत्थानासाठी एका व्यक्तीने २५ वर्षात जे करायचे होते ते जगात कोणत्याही व्यक्तीने केले नाही. ते मी एकट्याने तुमच्यासाठी केले. मी सर्वप्रथम तुमच्यात स्वाभिमानाची भावना निर्माण केली. हे कार्य मला सर्वात जास्त महत्वाचे वाटले. माझ्या आंदोलनापूर्वी अस्पृश्य समाजाची स्थिती जनावरापेक्षा बिकट होती. तो समाज अशा मानवताहीन परिस्थितीत संतुष्ट होता. मी अथक संघर्षातून अन्यायाच्या विरुद्ध लढण्याचे सामर्थ्य त्यांच्यात निर्माण केले. हे साधारण कार्य नाही.ङ्क ही जाणीव बाबासाहेब का करून देतात,कारण त्यावेळी समाज जयजयकार करण्यातच व्यस्त होता.तसा तो आजही आहे.

दुसऱ्याच्या मर्जीवर आ–पले आंदोलन निर्माण करणे शक्य नाही आणि तसा प्रयत्न केला तर त्याला आंदोलन म्हणता येणार नाही. त्यामध्ये स्वाभिमान नसतो. बाबासाहेबांचे समकालीन पेरियार रामासामींनी ब्राह्मणांना व त्यांच्या धर्मशास्त्रांना खुले आव्हान दिले होते. ब्राह्मणांच्या मानसिक आणि शारीरिक गुलामीतून मुक्त होण्यासाठी त्यांनी सेल्फ रिस्पेक्ट मूवमेंट चालवली. पेरियार आपल्या भाषणात म्हणतात, "आत्मसन्मान चळवळीचा उद्देश भारतीय समाजात जातीयतेने पीडित असलेल्यांमध्ये आत्मसन्मानाची भावना रुजवणे आणि भारतीय समाजात समानता प्रस्थापित करणे हा आहे. या चळवळीचा उद्देश केवळ देवतांना विरोध करणे हा नाही; तर भारतीय लोकांचा गमावलेला आत्मविश्वास परत मिळवणे हा आहे". पुढे पेरियार असेही म्हणतात की, या चळवळीच्या माध्यमातून, समाजात जातीमुळे प्रचलित असलेला भेदभाव दूर करून आम्ही बंधुभाव प्रस्थापित करण्यासाठी कार्य करू. हे एक प्रकारचे 'निस्वार्थ कार्य' आहे, म्हणजेच कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न करता केलेले कार्य. या चळवळीचा पाया कार्यकारणभावाच्या पद्धतीवर रचलेला आहे. हेच तिचे तत्त्वज्ञा–नही आहे. कोणत्याही घटनेमागील कारण शोधणे, मुळापर्यंत जाणे आणि समाजात प्रचलित असलेले अज्ञान नष्ट करणे हा आत्मसन्मान चळवळीचा उद्देश आहे. ही विचारधारा नंतर पेरियार यांच्या जीवनाचा गाभा बनली. ते म्हणायचे की, योग्य–अयोग्य समजून घेणे आणि नवीन गोष्टींचा शोध लावणे हेच चळवळीचे कार्य आहे.

आज परत स्वाभिमानाची चळवळ जिवंत करण्याची आवश्यकता आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आंदोलनातून एक सक्षम, बुद्धीजीवी आणि अधिकारी वर्ग निर्माण झाला आहे. सोबतच संविधानसारखे राष्ट्र निर्मितीचे दस्तावेज आहे. आम्ही आमची नैतिक आणि संविधानिक जबाबदारीचे निर्वाहन केले पाहिजे व बाबासाहेबांच्या स्वप्नातील आदर्श समाज निर्माण करण्यासाठी जीवाची बाजी लावली पाहिजे.

**जीवन गावंडे,७३५०४४२९२०**

# सामाजिक न्याय विभागामार्फत लाभार्थ्यांनी घेतला विविध योजनांचा लाभ

**गोंदिया :–** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग हा शाहू, फुले, आंबेडकर यांचे विचारांवर चालणारा विभाग असून मागासवर्गीयांचा शैक्षणिक, आर्थिक व सर्वांगिण विकासाकरीता नेहमी प्रयत्नशील असतो. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभागामार्फत खालील यशस्वी योजना राबविण्यात येतात.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९ (सुधारित अधिनियम २०१५) अंतर्गत दाखल खून किंवा अत्याचाराच्या अनुषंगाने झालेल्या खून किंवा मृत्यूच्या प्रकरणातील दिवंगत व्यक्तीच्या कुटुंबातील एका पात्र वारसास सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्त शासकीय संस्थांमध्ये नोकरी देण्याच्या अनुषंगाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे शासन निर्णय दि.२० नोव्हेंबर २०२५ नुसार कार्यपद्धती विहीत करण्यात आली आहे.

सदर अधिनियमांतर्गत जिल्ह्यातील अनुसूचित जाती–जमातीच्या खून किंवा मृत्यूच्या प्रकरणातील जिल्ह्यात दाखल झालेल्या खून किंवा मृत्यूच्या अनुसूचित जाती २० व अनुसूचित जमाती १० असे एकूण ३० प्रकरणांपैकी शासकीय नोकरीकरीता अनुसूचित जाती १६ व अनुसूचित जमाती ९ असे एकूण २५ वारसदारांचे अर्ज पात्र आहेत. सदर कायद्याअंतर्गत गोंदिया जिल्ह्यातील अनुसूचित जातीच्या ८ वारसांना दि.२० एप्रिल २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरातील नियोजन भवन सभागृहात जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. इंद्रनील नाईक यांच्या हस्ते गट–ड संवर्गातील शासकीय नोकरीचे नियुक्ती आदेश वाटप करण्यात आले.

गोंदिया जिल्ह्यातील ३ शासकीय निवासी शाळांमधील ४५ विद्यार्थी–विद्यार्थीनींचा दि.१३ ते १८ जानेवारी २०२६ या कालावधीत कोलकत्ता येथील सायन्स सिटी, बिरला तारामंडळ, विक्टोरिया मेमोरियल संग्रहालय, बॉटनीकल गार्डन, आय.आय.टी. खडगपूर व व्हीएमआरडीए आयएनएस कुरसुरा पाणबुडी संग्रहालय, विशाखापट्टनम येथे अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला होता. त्यातील नागपूर ते कोलकाता हा विमानप्रवास होता.

मॅट्रिकनंतरच्या शिक्षणाकरीता गोंदिया जिल्ह्यातील ४४१५ अनुसूचित जातीच्या मुला–मुलींना वर्ष २०२५–२६ मध्ये भारत सरकार शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आला. अनुसूचित जाती प्रवर्गाच्या ज्या पालकांचे उत्पन्न हे २.५० लाखापेक्षा जास्त आहे अशा पालकांच्या ८३ मुला–मुलींना फ्रिशिप योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.

सामाजिक न्याय विभागामार्फत ८ वसतीगृह कार्यरत असून १३४ मुले व ४०२ मुली सदर वसतीगृहाचा लाभ घेत आहेत. तसेच गोंदिया जिल्ह्यात या विभागामार्फत ३ शासकीय निवासी शाळा कार्यरत असून १७३ मुले व ३१५ मुली शिक्षणाचा लाभ घेत आहेत. इयत्ता ६ वी ते १० वी पर्यंत सर्व सोयी–सुविधेचा लाभ विद्यार्थी घेत असुन तिन्ही शाळा या आयएसओ नामांकित आहेत.

ज्या मुलांना शासकीय वसतीगृहामध्ये प्रवेश मिळाला नाही त्यांचेकरीता शासनाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येत असून, सदर योजनेत वर्ष २०२५–२६ मध्ये २८७ विद्यार्थ्यांना १२४.०० लक्ष रुपये वाटप करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाने सर्वांना घरे उप–लब्ध करुन देणे या ध्येयाअंतर्गत रमाई घरकुल (शहरी) योजनेमध्ये वर्ष २०२५–२६ करीता ५५ घरकुलांचे उद्दिष्ट्ये प्राप्त असून, २५ घरकुलांच्या प्रस्तावांना मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत शासनाने ४५ कामांना मंजूरी दिली असून रु. ४.०० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आ–लेला आहे, त्यापैकी १५ कामे प्रगतीपथ–ावर आहेत. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीच्या विकासाकरीता नागरी क्षेत्रासाठी रुपये १४६९.०० लक्ष तरतुद उपलब्ध करुन देण्यात आली होती, तसेच ग्रामीण क्षेत्रासाठी १३००.०० लक्ष तरतुद उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत वर्ष २०२५–२६ मध्ये ४६००.०० एवढा नियतव्यय मंजूर असून त्यामध्ये कृषी व संलग्न सेवेकरीता ५३१.०० एवढी तरतुद केलेली आहे, जेणेकरून कृषी व दुग्ध व्यवसायामध्ये मागासवर्गीयांची प्रगती होईल. ३१ मार्च २०२६ अखेर रुपये ४६००,०० मंजूर निधी १०० % खर्च करण्यात आला असून, मागासवर्गीयांच्या योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत.

# सारस पक्षी संवर्धन व विषमुक्त शेती विषयक कार्यशाळा




**गोंदिया:–** जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी व सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सारस पक्षी संवर्धन व विषमुक्त शेती या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा बुधवारी नवीन डीपीसी सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेत जिल्ह्यातील कृषी निविष्ठा विक्रेते, शेतकरी, कृषी अधिकारी व कर्मचारी, कृषी मित्र, स्वयंसेवी सारस मित्र यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

९

जिल्ह्यातील सारस पक्ष्यांची सद्यस्थिती, त्यांच्या अधिवासांचे संरक्षण, प्रजनन क्षेत्रांचे संवर्धन तसेच विषमुक्त आणि जैवविविधतेला पूरक शेती पद्धतींचा प्रसार हा कार्यशाळेचा प्रमुख उद्देश होता. सारस पक्ष्यांचे नैसर्गिक अधिवास टिकवून ठेवण्यासाठी स्थानिक शेतकरी, ग्रामस्थ आणि समुदायाचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमात सेवा संस्थेचे अध्यक्ष सावन बहेकार यांनी सारस पक्ष्यांची सद्यस्थिती, गोंदिया जिल्ह्यातील अधिवासांचा आढावा,

संवर्धनासमोरील विविध आव्हाने आणि समुदाय आधारित संवर्धनाची आवश्यकता याविषयी सविस्तर माहिती दिली. शेतकरी ग्रामस्तरावरील आणि

लोकसहभागाशिवाय सारस संवर्धनाची उद्दिष्टे साध्य होऊ शकत नाहीत, असे नमूद करत त्यांनी विषमुक्त शेतीचा अवलंब करण्याचे आवाहन केले.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी नीलेश कानवडे यांनी कृषी निविष्ठा विक्रेत्यांना मार्गदर्शन करताना पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत कृषी व्यवस्थेमध्ये त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. पर्यावरणास हानीकारक, जैवविविधतेस धोका निर्माण करणारी तसेच शासनामार्फत बंदी घालण्यात आलेली रासायनिक कीटकनाशके, तणनाशके व इतर रसायने शेतकऱ्यांना विक्री करू नयेत. अशा रसायनांच्या वापरामुळे मातीचे आरोग्य खालावते, जलस्रोत दूषित होतात, उपयुक्त कीटक आणि पक्ष्यांवर विपरीत परिणाम होतो तसेच पर्यावरणीय संतुलन बिघडते. विशेषतः सारस पक्ष्यासारख्या जैवविविधतेच्या दृष्टीने महत्त्वाच्या प्रजातींच्या अधिवासावर रसायनांचा गंभीर परिणाम होऊ शकतो, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

**शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब करा**

कृषी शास्त्रज्ञ राजा चौहान यांनी शाश्वत शेती पद्धतींवर मार्गदर्शन केले. त्यांनी मृदा आरोग्य संवर्धन, पाणी व्यवस्थापन, सेंद्रिय व जैविक निविष्ठांचा संतुलित वापर, उत्पादन खर्चात बचत तसेच पर्यावरणपूरक शेती तंत्रज्ञानाचा अवलंब याबाबत उपस्थितांना सविस्तर माहिती दिली. शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब केल्यास शेती उत्पादन क्षमतेसह जैवविविधतेचे संवर्धन आणि नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण साध्य होऊ शकते, असे सांगितले.

# सुरजागड खाणीत पर्यावरणपूरक प्रतिज्ञा

**एटापल्ली :–** लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडद्वारे संचालित सुरजागड खाणीत मजागतिक पर्यावरण दिन २०२६फ उत्साहात साजरा करण्यात आला. पर्यावरण संवर्धन, शाश्वत जीवनशैली आणि निसर्गाप्रती सामूहिक जबाबदारी याबाबत जनजागृती करण्यासाठी



येथे विविध उपक्रम पार पडले.

कार्यक्रमाची सुरुवात चित्रकला स्पर्धेने झाली. यात कर्मचाऱ्यांनी कचरा व्यवस्थापन, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकास या विषयांवर आपल्या कल्पकतेतून स्वच्छ व हिरवेगार भविष्याची दृष्टी मांडली.

ममिशन लाईफफ प्रतिज्ञा घेत सकारात्मक बदलाचा निर्धार कर्मचाऱ्यांनी केला. वृक्षारोपण मोहीमही राबविण्यात आली. या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

**औद्योगिक क्षेत्रात हरित उपक्रम**

हे सर्व उपक्रम लॉयड्स मेटल्सचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आले. औद्योगिक क्षेत्रात हरित उपक्रम, जैवविविधता संवर्धन आणि जबाबदार खाणकामाला त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले आहे. या उपक्रमातून कर्मचारी आणि व्यवस्थापनाने स्वच्छ व शाश्वत भविष्यासाठी आपली सामूहिक वचनबद्धता पुन्हा एकदा अधोरेखित केली. कर्मचाऱ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जागृती निर्माण झाली.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत्र)

# एक वर्ष पदपूर्तीतून जिल्ह्याला आरोग्य सेवेत मिळाला नावलौकिक



आरोग्य सेवा ही केवळ नोकरी नसून समाजसेवेचे एक प्रभावी माध्यम आहे. या माध्यमातून हजारो रुग्णांच्या जीवनात आपल्या एक वर्षाच्या कार्यकाळात रुग्ण व रुग्णांच्या नातेवाईकासंह प्रशासकीय यंत्रणेत आशेचा किरण निर्माण करणारे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.पुरुषोत्तम पटले यांनी जिल्हा शल्य चिकित्सक पदावरील यशस्वी कार्यकाळाचा एक यशस्वी टप्पा (दि.०९) पूर्ण केला आहे.

सामाजिक जाणीव आणि कष्टाची संस्कृती रुजलेल्या स्वभाव गुणांचे डॉ. पी. के. पटले हे जिल्ह्याच्या मातीतच जन्मले आहेत. तिरोडा तालुक्यातील मुंडीकोटा या छोट्याशा गावातून जीवनाचा प्रवास सुरू करणारे डॉ. पुरुषोत्तम पटले हे आज जिल्ह्यासाठी प्रेरणादायी ठरले आहेत. त्यांनी एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण केले. वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी सरकारी आरोग्य सेवेत प्रवेश करताना केवळ करिअर नव्हे, तर समाज–सेवेचे ध्येय स्विकारले. आरोग्य विभागातील विविध पदांवर काम करताना त्यांनी

ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांच्या आरोग्य समस्यांचा जवळून अभ्यास केला. रुग्णसेवा, शिस्तबद्ध प्रशासन आणि कर्मचाऱ्यांशी समन्वय साधण्याची त्यांची कार्यशैली त्यांना इतरांपेक्षा वेगळे ठरवते, जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून कार्यभार स्विकारल्यानंतर त्यांनी जिल्ह्या–तील आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम आणि लोकाभिमुख करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले.

त्यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा रुग्णालयातील आरोग्य सेवा अधिक गतिमान झाली. विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी, मातृ–मृत्यू व बालमृत्यू दर कमी करण्यासाठीचे प्रयत्न, रुग्णालयातील सुविधांचा विस्तार, आधुनिक वैद्यकीय उपकरणांची उपलब्धता आणि रुग्णांना दर्जेदार सेवा मिळावी यासाठी त्यांनी विशेष लक्ष दिले. सन २००१ पासून वैद्यकीय सेवेत प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळतानाच डॉ. पटले यांनी माणुसकीचा धागा कधीही तुटू दिला नाही. त्यांच्या दालनाचे दरवाजे सामान्य नागरिकांसाठी नेहमी खुले राहिले. रुग्णांच्या समस्या संवेदनशीलतेने ऐकून



त्यावर तत्काळ उपाययोजना करण्याची त्यांची कार्यपद्धती अनेकांच्या मनात विश्वास निर्माण करणारी ठरली आहे.

त्यांनी आपल्या १ वर्षाच्या कार्यकाळात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राष्ट्रीय बाल आरोग्य कार्यक्रमातर्गंत सन २०२५–२६ एकूण ४१ हृदय शस्त्रक्रिया व इतर शस्त्रक्रिया ५०० करण्यात आल्या.तसेच सर्वात महागड्या असलेल्या चहिरेपणा शस्त्रक्रिया केल्या. ग्रामीण रुग्णालय, देवरी येथे डायलिसीस युनिट पीपपी कार्यक्रमांतर्गत सुरु करुन १६३९ रुग्णांना डायलिसीची सेवा देण्यात आलेली आहे.ग्रामीण रुग्णालय देवरी व अर्जुनी मोरगाव तसेच उपजिल्हा रुग्णालय, तिरोडा येथे रक्त साठवणुक कक्ष सुरु करण्यात आले.सर्व ग्रामीण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णलय तिरोडा येथे एक्सरे मशिन सेवा सेंटर व ई.शि.जी. सेवा त्यांच्या कार्यकाळात सुरु करुन ग्रामीण भागातील रुग्णांना एक चांगली सेवा त्यांच्या एक वर्षाच्या कार्यकाळात उपलब्ध झाली आहे. महाराष्ट्रात गोंदिया जिल्हा हा ऑयबाल कलैक्शन सेंटर हे प्रथम क्रमाकावर आणण्याकरीता सर्वांच्या सहकार्याने केलेल्या प्रयत्नामुळे आरोग्य विभागात जिल्ह्याला नावलौकिक मिळाले आहे.

आज जिल्हा शल्य चिकित्सक पदावरील डॉ.पी.के.पटले यांच्या कार्यकाळाचे एक वर्ष पूर्ण होत असताना, हा केवळ पदपूर्तीचा क्षण नाहीः तर आरोग्य सेवेतील निष्ठा, प्रामाणिकपणा आणि समर्पणातून जिल्ह्याला नावलौकिक मिळवून देणारा गौरवाचा कार्यकाळ ठरला आहे. जिल्ह्याची आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, अधिक संवेदनशील आणि अधिक लोकाभिमुख बनविण्यात डॉ.पटले यांचा प्रवास आरोग्य क्षेत्रात कार्य करणाऱ्या प्रत्येकासाठी प्रेरणादायी ठरला आहे.

# जिल्हा वार्षिक योजनेचे प्रस्ताव वेळेत सादर करा-जिल्हाधिकारी डॉ.मंगेश गोंदावले

## जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला जिल्हा वार्षिक योजनेचा आढावा



**गोंदिया :-** जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी कामे करण्याकरीता जिल्हा वार्षिक योजनेतून निधी उपलब्ध करुन दिला जातो. यासाठी सर्व विभागाच्या अंमलबजावणी यंत्रणांनी त्यांचे प्रस्ताव निश्चित वेळेत सादर करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. मंगेश गोंदावले यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आज जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या अनुषंगाने सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना व आदिवासी उपयोजना क्षेत्रबाह्य अंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेचा आढावा घेण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, भारतीय वनसेवेचे अधिकारी प्रितमसिंग कोडापे, प्रभारी जिल्हा नियोजन अधिकारी रुपेशकुमार राऊत व सर्व विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. गोंदावले म्हणाले, वर्ष २०२६-२७ करीता जिल्हा वार्षिक योजनेची वित्तीय तरतुद ३२४ कोटी आहे. अंमलबजावणी यंत्रणांनी आपले प्रस्ताव दि.३० जून २०२६ पर्यंत सादर करावे. तर स्थानिक स्वराज्य संस्थांनी माहे ऑगस्ट २०२६ पर्यंत प्रस्ताव सादर करावे. पायाभुत विकास कामांचे सुयोग्य नियोजन व्हावे, कामात सुसूत्रता यावी, सर्व भागांचा समतोल विकास व्हावा व अनावश्यक खर्चात बचत व्हावी यासाठी यंत्रणांनी पायाभुत सुविधेची कामे करतांना युआयडी नंबर तयार (णखऊ ऋशपशीरींश) करणे आवश्यक आहे. कोणत्याही खरेदीवर निधीच्या १० % मर्यादा आहे, त्यामुळे अंमलबजावणी यंत्रणांनी याची दखल घ्यावी. सर्व अंमलबजावणी यंत्रणांना कर्मयोगी (ळर्ग्रो) कोर्स करणे अनिवार्य आहे, त्यामुळे पुढच्या आठ दिवसात सदर कोर्स पूर्ण करावे. यंत्रणांनी जिल्हा नियोजन समितीकडे निधीची मागणी करतांना मागील वर्षीची कामे पूर्ण झालेली आहेत, याची खात्री करुनच नवीन प्रस्ताव सादर करावे. जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने कामे करतांना कामांची गुणवत्ता उच्च दर्जाची राखण्याचे निर्देश देण्यात आले.

बैठकीत जिल्हा वार्षिक योजना वर्ष २०२६-२७ सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना, आदिवासी उपयोजना क्षेत्रबाह्य अंतर्गत प्रशासकीय मान्यता व निधी वितरणाकरीता तांत्रिक मान्यतेसह कामांचे सविस्तर परिपूर्ण प्रस्ताव सादर करणे. सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात मंजूर कामांच्या सद्यस्थितीबाबत अहवाल सादर करणे. या योजनेअंतर्गत मासिक प्रगती अहवाल सादर करणे तसेच सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाचे उपयोगिता प्रमाणपत्र व काम पूर्णत्वाचा दाखला सादर करणे. सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात मंजूर कामांवरील दायित्व निधीची मागणी करणे आदी बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावर्षीचे सर्व प्रस्ताव युआयडी नंबर (णखऊ) ऋशपशीरींश करुनच जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव सादर करण्यात यावे असे स्पष्ट करण्यात आले. गेल्या वर्षीच्या खर्चाच्या बाबतीत अनुपालन अहवालाची प्रत लवकरात लवकर नियोजन विभागाकडे पाठविण्यात यावे. नवीन कामांचे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करताना सविस्तर अंदाजपत्रक, तांत्रिक मान्यता आदेश, संबंधित योजनेत समावेश असल्याचे प्रमाणपत्र, दुरुस्तीच्या कामांसाठी आवश्यक प्रमाणपत्र बंधनकारक राहील, असेही स्पष्ट करण्यात आले. बैठकीचे संचालन प्रभारी जिल्हा नियोजन अधिकारी रुपेशकुमार राऊत यांनी केले.

# राजकीय हेतूने बदनामीचा कट; माजी सरपंच घरडे यांचा पलटवार




**एकोडी :-** तालुक्यातील स्मार्ट ग्रामपंचायत गंगाझरी येथे २५ मे २०२६ रोजी काही व्यक्तींनी ग्रामपंचायतीचे प्रशासक तथा माजी सरपंच सोनु घरडे आणि ग्रामपंचायत अधिकारी डी. के. महाकाळकर यांच्यावर विविध कामात आर्थिक गैरव्यवहार व भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. या आरोपांवर प्रशासक सोनुभाऊ घरडे यांनी पत्रपरिषदेच्या माध्यमातून सविस्तर खुलासा करीत सर्व आरोपांना निराधार, दिशाभूल करणारे तसेच राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे सांगितले.

माजी सरपंच व प्रशासक सोनु घरडे, ग्रा. पं. अधिकारी डी. के. महाकाळकर यांच्यावर आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप करण्यात आले होते. त्यातच आता सोनु घरडे यांनी त्या आरोपांना निराधार करून, तक्रारदारांनीच वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या रकमा सांगितल्याने त्यांच्या आरोपांतील विसंगती उघड झाल्याचा दावा घरडे यांनी केला आहे. ते पुढे म्हणाले, लेखी तक्रारीत तीन कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे नमूद करण्यात आले, तर काहींनी एक कोटी रुपये आणि इतरांनी ७० ते ८० लाख रुपयांच्या गैरव्यवहाराचा आरोप केल्याने ग्रामस्थांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न झाल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शासनाच्या नियमांनुसार ई-निविदा, दरपत्रक अथवा पोर्टलद्वारे खरेदी करण्याची तरतूद असून सर्व खरेदी नियमानुसार करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले. यु. के. इलेक्ट्रिकलच्या नावाने विविध तारखांना ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आल्याचे कागदोपत्री पुरावे उपलब्ध असल्याचेही सांगण्यात आले. आदिवासी सांस्कृतिक भवनाच्या बांधकामासंदर्भात यापूर्वी प्राथमिक चौकशी झालेली असून संबंधित कामासाठी प्राप्त


निधी व देयकांची सर्व नोंद ग्रामपंचायतीकडे उपलब्ध असल्याचे आहे. तसेच मूळ कागदपत्रांची मागणी जिल्हा परिषदेकडे करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

ग्रामपंचायत इमारत दुरुस्तीचे काम मासिक सभेतील सर्वानुमते मंजूर ठरावानंतरच करण्यात आले असून त्यासाठी आवश्यक प्रशासकीय आणि आर्थिक प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्याचा दावा करण्यात आला. त्याचप्रमाणे वृक्षारोपण व ट्रि-गार्ड खरेदीबाबतही सर्व खर्च शासनाच्या विविध योजनांतर्गत नियमांनुसार झाल्याचे स्पष्ट करण्यात आले.

शासकीय जागा विक्री केल्याच्या आरोपांनाही घरडे यांनी फेटाळून लावले. भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देणे, ग्रामपंचायतीचे उत्पन्न वाढविणे, अतिक्रमण रोखणे आणि स्थानिक रोजगार निर्मिती करणे या उद्देशाने शासनाच्या धोरणांनुसार कार्यवाही करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. यासाठी ग्रामसभा आणि मासिक सभेची मंजुरी घेतल्याचेही सोनु घरडे यांनी स्पष्ट केले.

ग्रामपंचायत अधिकारी डी. के. महाकाळकर यांच्यावर लावण्यात आलेले भ्रष्टाचाराचे आरोपही पूर्णपणे खोटे असल्याचा दावा करण्यात आला. त्यांना आर्थिक अधिकार ग्रामपंचायतीच्या ठरावाद्वारे देण्यात आले असून त्यांच्या विरोधातील आरोपांना कोणताही वस्तुनिष्ठ आधार नसल्याचे, आयोजित पत्रपरिषदेत स्पष्ट करण्यात आले.

# गोरेगावातील अशोक स्तंभ दुर्लक्षित



**गोंदिया:-** भारताचे राष्ट्रीय प्रतीक म्हणून ओळखला जाणारा अशोक स्तंभ हा देशाच्या संविधानिक मूल्यांचा, न्यायव्यवस्थेचा आणि राष्ट्राच्या एकात्मतेचे गौरवशाली प्रतीक मानले जाते. असे असताना गोरेगाव शहरातील मुख्य बसस्थानक चौकात नगरपंचायतीच्या माध्यमातून उभारण्यात आलेली अशोक स्तंभाची प्रतिकृती आज अतिक्रमण आणि अस्वच्छतेच्या विळख्यात सापडून आपली ओळख गमावत असल्याचे बघायला मिळत आहे. असे असताना याकडे नगर पंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.

गोरेगाव येथील बसस्थानक चौक हा अत्यंत महत्त्वाचा आणि गर्दीचा परिसर आहे. या चौकात हजारो नागरिक, विद्यार्थी, व्यापारी व प्रवासी दररोज ये-जा करतात. अशा प्रमुख ठिकाणी उभारण्यात आलेल्या अशोक स्तंभाच्या अवतीभोवती सध्या हातगाड्या, फेरीवाले आणि तात्पुरती दुकाने मोठ्या प्रमाणात लावली जात आहेत. काही व्यापाऱ्यांनी तर थेट अशोक स्तंभासमोरच दुकाने उभारल्यामुळे या राष्ट्रीय प्रतीकाचे अस्तित्वच झाकले जात आहे.

याशिवाय स्तंभाभोवती मोठ्या प्रमाणात कचरा, प्लॅस्टिक, सांडपाणी आणि अस्वच्छतेचे वातावरण निर्माण झाले आहे. परिसरात दुर्गंधी पसरत असून अशोक स्तंभाच्या ठिकाणीच अस्वच्छतेचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. त्यामुळे या प्रतीकाची गरिमा, प्रतिष्ठा आणि पावित्र्य धोक्यात आल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, नगरपंचायत प्रशासनाने वेळोवेळी अतिक्रमण हटविण्याच्या घोषणा केल्या, मात्र प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई होत नसल्यामुळे फेरीवाल्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. परिणामी चौकातील वाहतूक कोंडी वाढत असून नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

# वाघाच्या हल्ल्यात मृत्यू; कुटुंबाला आर्थिक मदत

**गोरेगाव :-** तालुक्याच्या कलपाथरी येथील शेतकरी डुलेश्वर संतोष खरकाटे (वय ३५) हे शुक्रवारी (ता. ५) सकाळी साडेसातच्या सुमारास वनपरिसरात बकऱ्यांसाठी चारा आणण्यासाठी गेले होते. यावेळी दबा धरून असलेल्या वाघाने हल्ला करून त्यांना ठार केले. दरम्यान,वनविभागाच्यावतीने पीडित कुटुंबास आर्थिक मदतीचा धनादेश जि.प.सभापती डॉ.लक्ष्मण भगत व वनपरिक्षेत्र अधिकारी भगत यांच्या हस्ते देण्यात आले.तसेच आमदार राजकुमार बडोले यांच्याकडून ५० हजार रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली. ही मदत माजी सभापती मनोज बोपचे, उपसभापती रामेश्वर महारवाडे, फनिंद्र पटले, सोमेश्वर रहांगडाले, लालचंद चव्हाण, बाबा बोपचे, किशोर मेश्राम, रवी पटले यांनी पीडित कुटुंबातील सदस्याकडे सुपूर्द केली.



डुलेश्वर खरकाटे हे नेहमीप्रमाणे शुक्रवारीदेखील सकाळी दुचाकीने गावालगतच्या जंगल भागात बकऱ्यांसाठी चारा आणण्यासाठी गेले होते. परंतु, बराच वेळ होऊनही ते घरी परत न आल्याने कुटुंबातील सदस्य व गावकऱ्यांनी डुलेश्वर खरकाटे यांचा शोध घेतला असता, जंगल परिसरात दुचाकी आढळून आली. फरफटत नेल्याचे चिन्ह दिसून आल्याने त्या मागोमाग पाहणी केली असता एका झुडपात डुलेश्वर हे मृतावस्थेत आढळून आले. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच आमदार राजकुमार बडोले यांनी तत्काळ ५० हजार रुपयांची आर्थिक मदत जाहीर करत कार्यकर्त्यांच्या हस्ते ही मदत पीडित कुटुंबास पोहोचती केली.

# खरिपाचे २ लाख हेक्टरवर नियोजन

**गोंदिया:-** यंदाच्या खरीप हंगामातील जिल्ह्यातील पेरणीचे नियोजन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. त्यानुसार जिल्ह्यात २ लाख ५ हजार ७८० हेक्टर क्षेत्रावर खरीप पेरणी प्रस्तावित करण्यात आली आहे. त्यासाठी ५६ हजार ८३४ क्विंटल बियाणे लागणार असून, खते-बियाणे महागणार असल्याचे सांगण्यात येत आहे. यंदाचा पावसाळा सुरू होण्यास अवघे काही दिवसाचा कालावधी उरला आहे. यंदाच्या हंगामात धानपिकाच्या लागवडीत वाढ होण्याची शक्यता आहे.



या पार्श्वभूमीवर यंदाच्या खरीप हंगामातील जिल्ह्यातील पेरणीचे नियोजन, त्यासाठी लागणारे बियाणे आणि खत साठ्याच्या मागणीचे नियोजन अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे. जिल्ह्यात २ लाख ५ हजार ८३४ हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी प्रस्तावित आहे. जिल्ह्याची ओळख धानाचे कोठार अशी असल्याने सर्वाधिक क्षेत्र भाताचेच आहे. त्यानंतर इतर पिकांच्या पेरणीचे प्रस्तावित नियोजन आहे. मात्र, यंदा मका पिकाच्या लागवडी वाढ होणार असल्याचा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला. जिल्ह्यातील खरीप पेरणीसाठी ५६ हजार ८३४ क्विंटल बियाणे मागणी करण्यात आले. त्यामध्ये धानाचे ५६ हजार ४३३ क्विंटल तर तुरीचे ४०१ क्विंटल नियोजन करण्यात आले. सध्या बाजारात ११ हजार ४३ क्विंटल धानाचे बियाणे उपलब्ध आहे. शेतकऱ्यांना बसणार भाववाढीचा फटका यंदा बियाणे व खतांचे दर वाढणार असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### भरारी पथके स्थापन

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी बोगस बियाणे व खतांची विक्री करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. यासाठी जिल्ह्यात ९ भरारी पथकांची स्थापना करण्यात आली असून ही पथके विविध भागांमध्ये अचानक तपासणी करणार आहे. कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली ही पथके बियाणे, खते आणि कीटकनाशकांची विक्री करणाऱ्या परवानाधारक विक्रेत्यांची तपासणी करतील. संशयास्पद साठा, बनावट उत्पादने तसेच नियमबाह्य विक्री आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. बियाणे व खतांच्या गुणवत्तेबाबत नमुने घेऊन त्यांची प्रयोगशाळेत तपासणीही केली जाणार आहे.

**जिल्ह्यात येत्या खरीप हंगामाची तयारी कृषी विभागाने सुरू केली असून, नियोजनानुसार पेरणीसाठी बियाणांची मागणी करण्यात आली आहे. तसेच बोगस बियाणे आणि खते विकणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी पथक गठीत केले आहे. यंदा खरीप हंगाम धान पिकाच्या लागवडीत वाढ होण्याची शक्यता आहे. मात्र, मृग नक्षत्रापासून पाऊस बरसायला हवा.**

**- नीलेश कानवडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,गोंदिया**

### मेरा युवा भारतच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनाचे आयोजन

**गोंदिया:** ५ जून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मेरा युवा भारत आणि अश्वमेध अथलेटिक्स अकादमी गोंदिया यांच्या संयुक्त विद्यमाने कारंजा येथील भद्रीटोला प्रशिक्षण मैदानावर जागतिक पर्यावरण दिनाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम मेरा युवा भारत गोंदियाचे उपनिदेशक सौरभकुमार निषाद यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच माजी स्वयंसेवक पुनम दमाहे व जागृत सेलोकर यांच्या नेतृत्यात पार पडला.कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून भारतीय सेनेतील जवान कलश नंदकिशोर चौधरी तसेच राष्ट्रीय पदक विजेत्या ॲथलीट लीना कोहडे उपस्थित होत्या. यावेळी उपस्थित मान्यवरांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्व अधोरेखित करत युवकांना निसर्गाप्रती आपली जबाबदारी पार पाडण्याचे आवाहन केले.

याप्रसंगी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत वेदांत मेश्राम यांनी प्रथम, कीर्ती ढेकवार यांनी द्वितीय तर मानसी पटले यांनी तृतीय क्रमांक मिळिवला. विजेत्यांचा सत्कार करून त्यांचा उत्साह वाढविण्यात आला.स्पर्धेनंतर भद्रीटोला मैदान परिसरातील विविध ठिकाणी खेळाडू व मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. खेळाडूंना संबोधित करताना ॲथलेटिक्स प्रशिक्षक जागृत सेलोकर यांनी पर्यावरण संरक्षण हा प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक असला पाहिजे असे प्रतिपादन केले. प्रत्येक नागरिकाने आपल्या वाढदिवसानिमित्त किमान एक तरी झाड लावावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. देशातील प्रत्येक नागरिकाने हा संकल्प स्वीकारल्यास दरवर्षी कोट्यवधी नवीन वृक्षांची लागवड होऊ शकते आणि पर्यावरण संरक्षणाला नवी दिशा मिळू शकते असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमादरम्यान सर्व खेळाडूंना पर्यावरण संरक्षणाची शपथ देण्यात आली. त्यांनी आपल्या वाढदिवशी किमान एक झाड लावण्याचा तसेच त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारण्याचा संकल्प केला.

# आरोप खोटे आढळल्यास आम्हाला फासावर लटकवा

**आंदोलकांचा पत्रकार परिषदेतून संताप; गंगाझरी ग्रामपंचायतीतील अपहार प्रकरण**




**गोंदिया :-** तालुक्याच्या गंगाझरी येथील ग्रामपंचायतीत कोट्यवधींचा अपहार झाला. आम्ही प्रशासनाकडे तक्रार करीत चौकशीची मागणी लावून धरली. आम्ही केलेले आरोप जर खोटे निघाल्यास आम्हाला खुशाल फासावर लटकवा, अशी संतप्त भूमिका आंदोलकांनी सोमवारी (ता.८) गंगाझरी येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेतून घेतली. दरम्यान, ग्रामपंचायतीतील अपहार प्रकरणाची चौकशी करावी, या मागणीसाठी त्यांनी सोमवारपासून बेमुदत धरणे आंदोलनास सुरवात केली आहे.

माजी सरपंच सोनू घरडे हेच ग्रामपंचायतीची सर्व ठेकेदारी करतात. त्यामुळे त्यांनी अनेक कामात बोगस बिल लावून घोळ केला आहे. गावातील मृत नागरिकांच्या अंत्यसंस्कारासाठी मोफत लाकडे देण्याचे नियोजन झाले होते. परंतु, मृताच्या कुटुंबांना लाकडे न देता त्यांच्या नावे हजारो रुपयांचे बिल काढण्यात आले. एवढेच नव्हे तर, सामान्य फंडातून चढ्या दराने वस्तूंची खरेदी करून लाखो रुपयांचा अपहार करण्यात आला आहे. भूखंड विक्री करून लाखो रुपये नागरिकांकडून वसूल करण्यात आले,

असा आरोप गावकरी आंदोलकांनी केला आहे. याशिवाय यु. के. इलेक्ट्रॉनिकच्या नावे कोणतेही ई- टेंडर नसताना त्या नावे लाखो रुपयांचे बिल काढल्याचा पुरावाच आंदोलकांनी पत्रकार परिषदेत सादर केला. ग्रामपंचायत संबंधात कोणतीही माहिती तसेच माहिती अधिकारात मागितलेली माहितीसुद्धा ते गावकऱ्यांना देत नाहीत. भूखंड विक्री, शोष खड्डे, नाडेप टाकी तसेच अंगणवाडी, शाळा दुरुस्तीच्या नावावर झालेला अपहार, साउंड सिस्टम व टीव्ही खरेदी, तसेच खुल्या बाजारातून झालेल्या वस्तू खरेदीत मोठी तफावत असल्याचा आरोपही पत्रकार परिषदेतून करण्यात आला आहे.

दरम्यान, जर आम्ही केलेले आरोप निराधार असतील तर आम्हाला खुशाल फासावर लटकविण्यात यावे, अन्यथा सोनू घरडे यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी पत्रकार परिषदेतून आंदोलकांनी केली आहे. पत्रकार परिषदेला हेमंत बघेले, सन्नी बघेले, रामसिंग पंधरे, नानाजी वाहने, छगन लिल्हारे, अर्जुन नागभिरे, गणपत टेकाम, योगेश पगरवार, सविता लिल्हारे, काजल पंधरे, जोत्सना उईके, मंजू बक्षरिया व अन्य गावकरी उपस्थित होते.

# वाहनांअभावी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी अडचणीत

### जिल्ह्यात २१ पथके पण एकही वाहन नाही

**राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत ० ते १८ वयोगटातील मुलांची आरोग्य तपासणी करण्यासाठी राज्यात १२०० तर गोंदिया जिल्ह्यात २१ पथके स्थापन करण्यात आली आहेत.प्रत्येक पथकात एक पुरुष व २ एक महिला असे दोन वैद्यकीय अधिकारी, आरोग्यसेविका व औषध निर्माता यांचा समावेश आहे, परंतु आता गोंदिया जिल्ह्यात एकही पथकासाठी वाहन नाही. ही स्थिती अख्ख्या महाराष्ट्रात आहे.**

**गोंदिया :-** राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत (आरबीएसके) शाळांमध्ये होणारी आरोग्य तपासणी गोरगरीब बालकांसाठी संजीवनी ठरत आहे; परंतु भाडे तत्त्वावर घेतलेल्या वाहनांचा करार संपल्याने नवीन करार करण्यात आला नाही. परिणामी राज्यातील ११९६ आरोग्य तपासणी वाहनांची चाके थांबली आहेत.

RBSK
RASHTRIYA BAL SWASTHYA KARYAKRAM
राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम
FROM SURVIVAL TO HEALTHY SURVIVAL

काही जिल्हा शल्यचिकित्सकांनी आपापल्या सोयीनुसार वाहन उपलब्ध करून देऊन शालेय तपासणी सुरू ठेवली, परंतु यंदाच्या सत्रात शालेय तपासणीसाठी अडचण येणार असल्याने आरबीएसकेचे राज्यभरातील कर्मचारी टेन्शनमध्ये दिसून येत आहेत.

गेल्या वर्षभरात गोंदिया जिल्ह्यात सुमारे १ लाख ८४ हजार २१० विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीमध्ये हृदयविकार, दृष्टिदोष असलेली मुले आढळून आली होती. मागच्या आर्थिक वर्षात मुलांच्या तपासणीला सुरुवात बालस्वास्थ्य करण्यापूर्वी गोंदिया जिल्ह्यातील २१ पथकांची वाहनेच काढून घेण्यात आली, परंतु जिल्हा शल्यचिकित्सकांनी शालेय तपासणीसाठी रुग्णवाहिका उपलब्ध करून दिल्याने शालेय तपासणी करता आली. राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत कार्यरत पथकांना जिल्हाभरातील शाळा-अंगणवाड्यांमध्ये जाऊन मुलांची आरोग्य तपासणी करण्यासाठी राज्यस्तरावरून वाहने पुरविली जातात. सन २०१९-२० या वर्षात वाहन पुरवठा करण्यासाठी तीन वर्षांचा करार झाला होता. वर्षभरापूर्वीच हा करार संपुष्टात आला.

नवीन करार होईपर्यंत त्या त्या जिल्ह्यातील पुरवठादारांनाच वाहने सुरू ठेवण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानुसार मार्च २०२३-२४ पर्यंत ही वाहने सुरू होती, मात्र, भाडे परवडत नसल्यामुळे जिल्ह्यातील पुरवठादारांची सर्व १९ वाहने काढून घेतली आहेत. मागील वर्षी वर्षभर जिल्हा शल्यचिकित्सकांनी रुग्णवाहिका पुरवून शालेय आरोग्य तपासणी केली, परंतु आता जून-जुलैपासून नवीन शैक्षणिक सत्र होणार आहे. दरवर्षीप्रमाणे शालेय मुले, तसेच अंगणवाड्यांतील बालकांच्या आरोग्य तपासणीला जुलै महिन्यात प्रारंभ केला जातो; पण वाहनेच उपलब्ध नसल्यामुळे शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणी कशी होणार हा प्रश्न उपस्थित होत आहे.

**राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत आरोग्य तपासणी पथकाला वाहन दिले जाते, परंतु कंत्राट संपल्याने वाहनांची व्यवस्था करण्याचे व त्याचे कंत्राट देण्याचे काम विभागांनाच देण्यात आले आहेत. राज्यातील ११९६ पथकांसाठी वाहन संबंधित विभागाकडून उपलब्ध केला जाईल. त्यात अडचण आली तर संबंधित जिल्हा ती अडचण दूर करेल. काही दिवसातच ही समस्या सुटेल.**

**रवींद्र चौधरी, साहाय्यक संचालक, राष्ट्रीय बाल आरोग्य कार्यक्रम, पुणे**

# शेतकरी कर्जमाफीच्या यादीचे होणार लेखापरिक्षण

**गोंदिया :-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना राज्य शासनाने जाहीर केली आहे. ३० जून पूर्वी या प्रकरणात अध्यादेश निघणार आहे. तत्पूर्वी कुठल्या उपाययोजना कराव्या याबाबत सहकार आयुक्तांनी राज्यातील सर्व जिल्ह्यांना सूचना दिल्या आहे. यात अध्यादेश निघाल्यानंतर काय खबरदारी घ्यावी, याचा सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने ऑनलाइन स्वरूपात ज्या थकीत शेतकऱ्यांची नावे दाखल झाली, त्या नावाच्या थकीत कर्जाचे ऑडिट करण्याच्या सूचना आहेत.

थकीत शेतकऱ्यांच्या नावाचे आणि नियमित कर्जदार शेतकऱ्यांच्या नावाचे ऑडिट केले जाणार आहे. त्यासाठी टीमतयार करण्यात आली आहे. या ऑडिटरकडे तालुका आणि या तालुक्यातील शाखांची जबाबदारी देण्यात आली आहे. यामुळे खात्याचे ऑडिट झाल्यानंतर किती कर्जमाफी होणार, कधीपासूनचे थकबाकीदार आहेत. त्यांचे व्याज किती, ते कर्जमाफीला पात्र आहेत काय, याची माहिती मिळणार आहे. याशिवाय नियमित कर्जदार असेल तर सानुग्रह मदतीला तो पात्र आहे काय, याला किती सान्ग्रह मदत द्यायची याची माहिती मिळण्यास मदत होणार आहे. ही यादी नंतर पोर्टलवर अपलोड होणार आहे. या संपूर्ण कामासाठी अध्यादेश निघाल्यावर १५ दिवसांचा कालावधी लागणार आहे. पेरणी काही दिवसांवर येवून ठेपलेली असताना शासकीय उपाययोजना अद्यापही बाकी आहेत. आदेश निघाल्यानंतर विविध प्रक्रिया पार पाडल्या जाणार आहेत. यानंतर नव्याने कर्ज मिळेल.

# राष्ट्रीय पंचायत पुरस्कारासाठी वडेगाव स्टेशनची क्षेत्रीय पडताळणी

**अर्जुनी-मोरगाव :-** तालुक्यातील वडेगाव स्टेशन ग्रामपंचायतीमध्ये राष्ट्रीय पंचायत पुरस्कार २०२६ अंतर्गत मस्वच्छ व हरित गावफ या श्रेणीसाठी क्षेत्रीय पडताळणी नुकतीच उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. अमरावती विभागाच्या अप्पर आयुक्त (विकास) श्रीमती शालिनी अनिल कडू यांनी गावाला भेट देऊन विविध विकासकामे, स्वच्छता उपक्रम व पर्यावरण संवर्धनाच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली.

पाहणीदरम्यान गावात कचऱ्यापासून तयार करण्यात आलेल्या आकर्षक कलाकृती, सजावटीच्या वस्तू व विविध देखाव्यांनी समितीचे लक्ष वेधून घेतले. तसेच गावातील भिंतींवर रेखाटण्यात आलेली सामाजिक संदेश देणारी चित्रे आणि बोलक्या भिंतींचेही विशेष कौतुक करण्यात आले.यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी वासनिक, गटविकास अधिकारी श्रीमती पल्लवी वाडेकर,विस्तार अधिकारी राणे व कन्नके यांच्यासह ग्रामपंचायत पदाधिकारी, कर्मचारी, महिला बचत गटांच्या सदस्य, युवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. वडेगाव स्टेशन ग्रामपंचायतीने स्वच्छता, पर्यावरण संवर्धन,

लोकसहभाग आणि शाश्वत विकासाच्या माध्यमातून आदर्श गावाचा नमुना उभा केला असून राष्ट्रीय पंचायत पुरस्कार २०२६ च्या स्पर्धेत



गावाने आपली भक्कम दावेदारी सिद्ध केल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

विविध उपक्रमांची विशेष दखल ग्रामपंचायतीने राबविलेल्या आठवड्यातील एक तास गावासाठी तसेच 'दर शनिवारी स्वच्छता अभियान' या उपक्रमांमुळे ग्रामस्थांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण झाली असून लोकसहभागाचे उत्कृष्ट उदाहरण गावाने सादर केल्याचे मत अधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

गावातील विद्युत खांबांवर बसविण्यात आलेल्या ९३ एलईडी दिव्यांमुळे रात्रीच्या वेळी संपूर्ण गाव प्रकाशमान होत असून या उपक्रमाचेही विशेष कौतुक करण्यात आले. याशिवाय गावात २५ हजारांहून अधिक वृक्षांची लागवड व संवर्धनाचे काम प्रभावीपणे सुरू असल्याने वडेगाव स्टेशनने हरित ग्राम म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. कचरा व्यवस्थापनासाठी उभारण्यात आलेले अत्याधुनिक मटेरियल रिकव्हरी फॅसिलिटी सेंटर, स्वच्छ व नीटनेटका परिसर आणि घनकचरा व्यवस्थापनाची प्रभावी अंमलबजावणी यामुळे समिती प्रभावित झाली. तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत गावात मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती करण्यात आल्याची विशेष दखल घेण्यात आली.


**ग्रामपंचायत कार्यालय पिंडकेपार**
**पंचायत समिती गोरेगाव,जि.प.गोंदिया**
**ई-निविदा**

**निविदा क्रं.१** **दिनांक-०८/०६/२०२६**

ग्रामपंचायत कार्यालय पिंडकेपार,पंचायत समिती गोरेगाव,जि.प.गोंदिया येथील सन २०२६-२७ मध्ये विविध कामे/ विकास काकरीता लागणारे साहित्य पुरवठा करण्याकरीता ई-निविदा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे.सदर ई-निविदेची विस्तृत माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेत स्थळ www.mahatenders.gov.in वर उपलब्ध असून विस्तृत माहिती ग्रामपंचायत कार्यालय येथे उपलब्ध आहे.

**ई-निविदा तपशिल**

| | | |
|---|---|---|
| १ | ई- निविदा प्रसिध्दी व दाखल करण्याचा दिनांक | दिनांक ०८/०६/२०२६ पासून |
| २ | ई- निविदा दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक १५/०६/२०२६ ला.सायं.५.०० पर्यत |
| ३ | ई- निविदा उघडण्याची दिनांक | दिनांक १६/०६/२०२६ ला.१२.०० वा.शक्य झाल्यास |

**विस्तृत माहिती ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डावर बघावयास मिळतील तसेच अटी व शर्ती सर्वांना लागू राहतील.**

**सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय पिंडकेपार**

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत कार्यालय पिंडकेपार**

# आत्मसमर्पित माओवादी सदस्यांनी बांधली विवाह गाठ



## गोलू आणि संगीताची नव्या आयुष्याकडे वाटचाल

**हा विवाह केवळ एक सामाजिक कार्यक्रम नसून परिवर्तन, पुनर्मिलन, विश्वास आणि शांततामय भविष्याच्या आशेचा उत्सव आहे.**
**पोलिस अधीक्षक**

**गोंदिया :–** अलीकडील काळात गोंदिया जिल्ह्यात एकूण १५ माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले असून त्यांना पोलीस मुख्यालय कारंजा, गोंदिया येथील पोलीस वसाहतीत ठेवण्यात आलेले आहे. या आत्मसमर्पित सदस्यांपैकी पांडू पुसू वड्डे ऊर्फ गोलू आणि सैवंती रायसिंग पंधरे ऊर्फ संगीता या दोघांनी आजन्म सोबत राहण्याची विवाह गाठ पोलीस मुख्यालयात बांधली. त्यांच्या या लग्न सोहळ्यास पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांनी मंजुरी देत इथेच त्यांचे लग्न लावूनही दिले.

वर– पांडू पुसू वड्डे (वय ३७ वर्षे), रा. तिरलागड, ता. पखांजूर, जि. कांकेर (छत्तीसगड), माओवादी संघटनेत गोलू या नावाने ओळखला जात होता. तो सीपीआय (माओवादी) संघटनेत दर्रेकसा एरियामध्ये डिव्हिजनल कमिटी सदस्य (उ्नउच) म्हणून कार्यरत होता.

वधू– सैवंती रायसिंग पंधरे (वय ३६ वर्षे), रा. राशीमेटा, ता. बैहर, जि. बालाघाट (मध्यप्रदेश), माओवादी संघटनेत संगीता या नावाने ओळखली जात होती. ती दरेकसा एरिया कमिटीमध्ये एरिया कमिटी सदस्य (अउच) म्हणून कार्यरत होती.

अनेक वर्षे हिंसाचार, संघर्ष आणि अनिश्चिततेच्या वातावरणात जीवन व्यतीत केल्यानंतर या दोघांनीही २८ नोव्हेंबर २०२५ रोजी गोंदिया पोलिसा समक्ष आत्मसमर्पण करून मुख्य प्रवाहात परतण्याचा धाडसी निर्णय घेतला. समाजात सन्मानाने जगण्याची, स्वतःचे कुटुंब उभे करण्याची आणि शांततामय भविष्य घडविण्याची त्यांची इच्छा या निर्णयामागे होती.

हा विवाह केवळ दोन व्यक्तींचा मिलाफ नसून हिंसेवर शांततेचा, भीतीवर विश्वासाचा आणि निराशेवर आशेचा विजय आहे. कुटुंबीय, नातेवाईक, स्थानिक नागरिक आणि पोलीस अधिकारी/अंमलदार यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सोहळ्याने नवजीवनाची, स्वीकाराची आणि सामाजिक पुनर्स्थापनेची सुंदर अनुभूती सर्वांना दिली.शासनाच्या आत्मसमर्पण व पुनर्वसन योजनांतर्गत नमूद आत्मसमर्पित माओवाद्यांचे आधार कार्ड, इलेक्शन कार्ड, बँक खाते आणि इतर विविध आवश्यक कागदपत्रे तयार करणे, रोजगाराभिमुख प्रशिक्षण देणे, तसेच त्यांचे पुनर्वसन संबंधाने इतर कार्यवाही सुरु असून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची प्रक्रिया सुरू आहे.

याच पुनर्वसन प्रक्रियेचा एक भावनिक आणि प्रेरणादायी टप्पा म्हणून पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांचे संकल्पनेतून, तसेच प्रभारी पोलीस अधीक्षक अभय डोंगरे यांचे मार्गदर्शनाखाली रविवारी परिवर्तन आणि नव्या जीवनप्रवासाचे प्रतिक ठरणारा एक हृदयस्पर्शी व प्रेरणादायी विवाह सोहळा पार पडला.

शासनाच्या आत्मसमर्पण व पुनर्वसन धोरणाच्या यशाचे जिवंत उदाहरण म्हणून दोन आत्मसमर्पित सी.पी.आय. (माओवादी) नक्षल सदस्य विवाहबंधनात अडकले आणि शांततामय, सन्माननीय जीवनाची नवी सुरुवात केली.

हा प्रसंग शासनाच्या आत्मसमर्पण व पुनर्वसन धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीचा तसेच पोलीस विभाग व जिल्हा प्रशासनाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा परिणाम आहे. योग्य संधी, मार्गदर्शन आणि समाजाचा स्वीकार मिळाल्यास हिंसक विचारसरणीच्या प्रभावाखाली गेलेले व्यक्तीदेखील शांततेचा मार्ग स्वीकारून समाजाचे जबाबदार घटक बनू शकतात, याचे हे प्रेरणादायी उदाहरण आहे.

या विवाह सोहळ्यामुळे अद्याप जंगलात कार्यरत असलेल्या माओवादी सदस्यांनाही एक सकारात्मक संदेश मिळतो की, हिंसेचा मार्ग सोडून आत्मसमर्पण केल्यास त्यांनाही सन्मानाने, सुरक्षिततेने आणि आनंदाने जीवन जगण्याची संधी उपलब्ध आहे. प्रत्येक व्यक्तीला नव्याने उभे राहण्याची आणि समाजात आपले स्थान निर्माण करण्याची दुसरी संधी मिळू शकते, हा विश्वास या घटनेने अधिक दृढ केला आहे.

संपूर्ण विवाह सोहळा शांततापूर्ण वातावरणात आणि कोणताही अनुचित प्रकार न घडता यशस्वीरित्या पोलिस मुख्यालय कारंजा, गोंदिया येथील प्रेरणा सभागृहात पार पडला. प्रभारी पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, पोलिस निरीक्षक नक्षल सेल प्रमोद भातनाते, राखीव पोलीस निरीक्षक राजेश सरोदे, पोलीस उपनिरीक्षक नक्षल सेल श्रीकांत हत्तीमारे, नक्षल ऑपरेशन सेल देवरी मल्लिकार्जुन वासुदेव, तसेच नक्षल सेल गोंदिया, इंटर सेल देवरी, सी ६० पथक आणि पोलिस मुख्यालय, गोंदिया येथील पोलीस स्टाफने आवश्यक समन्वय व सहकार्य उपलब्ध करून दिले.

# ‘एनएनटीआर’ विरोधात ग्रामस्थ आक्रमक

## मुरदोली पर्यटन प्रवेशद्वार बंद करण्याची मागणी

**गोंदिया:–** गोरेगाव तालुक्यातील कलपाथरी जंगल परिसरात वाघाच्या हल्ल्यात एका तरुणाचा मृत्यू झाल्यानंतर बफर झोनमधील ग्रामस्थांनी नागझिरा–नवेगाव व्याघ्र राखीव क्षेत्र (एनएनटीआर) प्रशासन आणि वन विभागाविरोधात नाराजी व्यक्त केली आहे. मुरदोली बफर झोनमधील पर्यटन प्रवेशद्वार तत्काळ बंद करण्यात यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली असून, अन्यथा व्यापक जनआंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे.

कलपाथरी येथील डुलेश्वर संतोष खरकाटे (३१) हा शुक्रवारी बकऱ्यांसाठी झाडांच्या फांद्या आणण्यासाठी जंगलात गेले असता वाघाने त्यांच्यावर हल्ला करून ठार केले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली उली आहे. जिल्हा परिषद सदस्य सशेंद्र भगत, सामूहिक वनहक्क समितीचे सचिव किशोर मेश्राम, सुनील बहेकार, माजी सरपंच मुकेश खरोले, समितीचे अध्यक्ष शिवपाल टेकाम, कृष्णकुमार ताराम, अब्दुल सय्यद यांच्यासह स्थानिक नागरिकांनी मुरदोली पर्यटन प्रवेशद्वारामुळे



**ही घटना अत्यंत दुर्दैवी आहे, मात्र, तिचा थेट संबंध पर्यटन सफारीशी जोडता येणार नाही. संबंधित परिसरात वाघाचा वावर पूर्वीपासूनच असून वनविभागाकडून नागरिकांना वेळोवेळी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.**
**प्रितमसींग कोडापे, उपसंचालक, नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्प**

वन्यजीवांच्या नैसर्गिक अधिवासावर परिणाम होत असल्याचा आरोप केला आहे.

मुरदोली परिसरात सुरू असलेल्या पर्यटन सफारी तसेच जंगलातील रस्ते बांधकामासाठी जेसीबीसारख्या यंत्रांचा वापर होत असल्याने वन्यप्राणी अस्वस्थ होत असून ते गावांच्या दिशेने स्थलांतरित होत आहेत. त्यामुळे मानव–वन्यजीव संघर्षाच्या घटनांमध्ये वाढ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. याशिवाय, मुरदोली पर्यटन क्षेत्राचा काही भाग ग्रामसभेच्या नियंत्रणाखाली असतानाही सफारी सुरू करण्यासाठी ग्रामसभेची आवश्यक मंजुरी घेण्यात आलेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

तसेच नागझिरा अभयारण्यातील गेल्या ३० ते ३५ वर्षांपासून बंद असलेले पर्यटन प्रवेशद्वार पुन्हा सुरू करण्याची मागणीही त्यांनी केली आहे. मुरदोली पर्यटन प्रवेशद्वार बंद न केल्यास नागझिरा–नवेगाव व्याघ्न राखीव क्षेत्र प्रशासनाविरोधात तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# गोंदियाला आधुनिक रेल्वे अनुरक्षण सुविधांची भेट

**गोंदिया:–** जून–दक्षिण पूर्व मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक तरुण प्रकाश यांनी गुरुवारी गोंदिया येथील रेल्वे अनुरक्षण व परिचलन व्यवस्थेची सविस्तर पाहणी केली. यावेळी त्यांनी १२ डब्यांच्या मेमू रेकच्या देखभालीसाठी डेमू शेड विस्तार प्रकल्पांतर्गत उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक नॉन–ईओटी कव्हर शेडचे लोकार्पण केले. तसेच डेमू शेड, कोचिंग डेपो, पीट लाईन आणि रनिंग लॉबीची पाहणी करून सुरक्षा, अनुरक्षण गुणवत्ता आणि परिचालन कार्यक्षमतेचा आढावा घेतला. यावेळी दक्षिण पूर्व मध्य रेल्वेचे प्रधान मुख्य यांत्रिक अभियंता मनीष अग्रवाल, नागपूर मंडळाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपककुमार गुप्ता, मुख्यालय व मंडळातील वरिष्ठ अधिकारी–कर्मचारी तसेच रेल्वे परामर्शदात्री सहयोग समितीचे सदस्य उपस्थित होते. महाव्यवस्थापकांनी डेमू शेडमधील



रेल्वे इंजिन आणि मेमू–डेमू रेकच्या देखभाल प्रक्रियेची पाहणी केली.

आधुनिक उपकरणे व तांत्रिक सुविधांचा आढावा घेत त्यांनी नव्या नॉन–ईओटी कव्हर शेडमुळे रेल्वेच्या अनुरक्षण क्षमतेत वाढ होऊन रेल्वे सेवा अधिक सुरक्षित आणि विश्वासार्ह होणार असल्याचे सांगितले. यानंतर त्यांनी गोंदिया कोचिंग डेपो आणि पीट लाईनची पाहणी करून डब्यांची स्वच्छता, देखभाल, पाणीपुरवठा, प्रकाश व्यवस्था आणि सुरक्षा मानकांची तपासणी केली. प्रवाशांना अधिक सुरक्षित व आरामदायी प्रवास मिळावा म्हणून उच्च दर्जाची अनुरक्षण व्यवस्था कायम ठेवण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

रनिंग लॉबीच्या पाहणीदरम्यान त्यांनी लोको पायलट व सहायक लोको पायलट यांना उपलब्ध सुविधा, क्रूव्यवस्थापन प्रणाली, सुरक्षा सल्ला यंत्रणा आणि विश्रांती सुविधांची माहिती घेतली. सुरक्षा ही रेल्वेची सर्वोच्च प्राथमिकता असून प्रत्येक कर्मचाऱ्याची सतर्कता, शिस्त आणि कार्यनिष्ठा सुरक्षित रेल्वे संचालनासाठी अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी विभागीय रेल्वे व्यवस्थापक गुप्ता यांनी, नागपूर मंडळात सुरू असलेल्या कामांबाबत महाव्यवस्थापकांना माहिती दिली.

# मातोश्री पाणंद रस्ता बांधकामात केली जातेय नियमांची पायमल्ली

**तिरोडा :–** ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेती उपयोगी साहित्य शेतापर्यंत पोहोचवण्यासाठी तसेच कृषी उत्पादन वेळेत बाजारापर्यंत नेण्यासाठी राज्य शासनामार्फत राज्य रोजगार हमी योजना व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना (मनरेगा) च्या माध्यमातून मातोश्री शेत पाणंद रस्ता निर्माण योजना राबवली जात आहे. परंतु, तिरोडा तालुक्यातील ग्रामीण भागात या महत्त्वाकांक्षी अंमलबजावणीबाबत गंभीर उपस्थित होऊ लागले आहेत. योजनेच्या प्रश्न

तालुक्यातील बहुतांश गावांमध्ये योजनेच्या नियमांना फाटा देऊन कामे केली जात असल्याची माहिती आहे. नियमानुसार ज्या कामांमध्ये गावातील मनरेगा मजुरांना रोजगार मिळायला हवा, तेथे कंत्राटदारांकडून कंत्राटी पद्धतीने बाहेरील मजूर आणून किंवा जेसीबी व मशीनचा वापर करून



## चौकशी करून केली कारवाईची मागणी

**संपूर्ण प्रकरणाच्या उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली जात आहे. वेळीच चौकशी झाली नाही, तर योजनेच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होणे निश्चित आहे. ग्रामस्थांनी मागणी केली आहे की, सर्व बांधकामांची तांत्रिक तपासणी करावी, मजुरांच्या प्रत्यक्ष उपस्थितीची चौकशी व्हावी, तसेच ज्या कामांमध्ये मशीनचा वापर केला आहे, तेथे संबंधित अधिकारी व कंत्राटदारांवर कठोर कारवाई करावी.**

रस्ता बांधकाम केले जात आहे. यामुळे शासनाचा रोजगार उपलब्ध करून देण्याचा मूळ उद्देशच धोक्यात आला आहे. या कामांमध्ये रस्ता खडीकरणासह सीडी वर्क (पाणी निचरा संरचना) ची कामेही समाविष्ट आहेत.

विशेषतः सीडी वर्कचे खोदकाम मजुरांकडून करवून घेणे आवश्यक असताना, कंत्राटदार

## नियमबाह्य कामांना अधिकाऱ्यांची मूकसंमती

**शासनाच्या जीआरनुसार रस्ता खडीकरणाच्या कामाच्या सुरुवातीला रस्त्याचे खोदकाम केल्यानंतर ८० एमएम व ४० एमएम खडीचा वापर करून त्यावर रोलर फिरवून मजबूत करणे अनिवार्य आहे. तसेच मुरूम पाण्याने घोटाई करणेही आवश्यक आहे. परंतु, बहुतांश बांधकामांमध्ये ८० एमएम खडीचा वापर कमी प्रमाणात किंवा अजिबात न करणे, रोलर फिरवून मजबुतीकरण न करणे आणि मुरूम टाकल्यानंतर पाणी टाकून रोलरने घोटाईही न करण्याच्या तक्रारी आहेत. मात्र, याकडे संबंधित अधिकाऱ्यांनी डोळेझाक केली आहे.**

मशीनच्या साहाय्याने खोदकाम करत आहेत. यामुळे स्थानिक मजुरांमध्ये नाराजी दिसून येत आहे. मातोश्री पाणंद योजनेंतर्गत प्रत्येक रस्ता खडीकरणाच्या कामात मनरेगाच्या अकुशल निधीतून सुमारे ६ लाख रुपये मजुरांच्या बँक खात्यात जमा होणार आहेत. काम सुरू करण्यापूर्वी संबंधित विभागाकडून काम करणाऱ्या मजुरांचे मस्टर ऑनलाईन करणे आवश्यक असते. परंतु, अनेक कामांमध्ये नियमांना डावलून बोगस मजुरांची नावे नोंदवून कामे केली जात आहेत. या संपूर्ण प्रकरणात जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांची मिलीभगत उघड होत आहे.

तिरोडा तालुक्यातील मातोश्रीच्या या सर्व कामांची संपूर्ण जबाबदारी तहसीलदारांवर असून जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या देखरेखीखाली कामे केली जात आहेत. सोबतच मनरेगा विभागाच्या एका तांत्रिक सहाय्यकाचीही योजनेच्या देखरेखीसाठी नियुक्ती करण्यात आली आहे.

# ‘संडे ऑन सायकल’ रॅलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!



**गोंदिया:** “सुदृढ शरीर, सशक्त मन आणि सुरक्षित समाजङ्ग या प्रेरणादायी संकल्पनेला मूर्त रूप देत गोंदिया जिल्हा पोलीस दलाच्या वतीने जागतिक सायकल दिन आणि मफिट इंडिया अभियाना’ निमित्त ०६ जून रोजी पोलीस मुख्यालय, कारंजा येथे “संडे ऑन सायकल” या विशेष उपक्रमाचे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले.

मा. पंतप्रधानांनी सुरू केलेल्या मफिट इंडियाफ अभियानाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविणे, नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, पर्यावरणपूरक जीवनशैलीला प्रोत्साहन देणे आणि पोलीस–जनता संबंध अधिक दृढ करणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.पहाटेच्या प्रसन्न वातावरणात पोलीस अधिकारी, अंमलदार, त्यांचे कुटुंबीय, पोलीस मित्र, विद्यार्थी, युवक–युवती आणि ज्येष्ठ नागरिक अशा विविध क्षेत्रांतील सुमारे २५० हून अधिक सायकलप्रेमींनी पोलीस मुख्यालय, कारंजा येथे हजेरी लावली.

# लोकसहभागातून जुन्या इमारतीत वाचनालय सुरू

**गोंदिया:–** ग्रामीण भागातील शिक्षणाला चालना देत युवक–युवतींच्या स्वप्नांना नवी दिशा देण्यासाठी पिंडकेपार ग्रामपंचायतीने लोकसहभागातून ग्रामपंचायतीच्या जुन्या इमारतीत वाचनालय सुरू करून आदर्श उपक्रम राबविला आहे. या वाचनालयाच्या माध्यमातून गावातील युवक–युवती आता स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करून आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी तयारी करत आहेत.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ५ जून रोजी पिंडकेपार जिल्हा परिषद शाळेचे माजी विद्यार्थी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी अनिल हिरदीलाल पटले यांच्या हस्ते वृक्षारोपण करून वाचनालयाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच योगिता सहारे होत्या. यावेळी उपसरपंच भरतराम घासले, ग्रामपंचायत अधिकारी रीना राऊत, सदस्य चंद्रकिशोर पटले, मंगला पटले, रेखा रहांगडाले, कला चौधरी, रूपा लटये, ग्रामपंचायत कर्मचारी राजकुमार साखरे, प्रशांत साखरे, राजेश चुलपार तसेच महिला बचत गटांच्या सदस्यांसह ग्रामस्थ आणि युवक–युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गोरेगाव पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या पिंडकेपार गावात अभ्यासासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने युवक–युवतींना शिक्षण व स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी सुमारे १० किलोमीटर अंतरावर असलेल्या गोरेगाव येथे जावे लागत होते. गावात वाचनालय




सुरू करण्याची मागणी ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीकडे केली होती. मात्र विविध प्रशासकीय प्रक्रियांमुळे या उपक्रमाला विलंब होत होता.

युवकांच्या गरजा लक्षात घेऊन ग्रामपंचायतीने सकारात्मक निर्णय घेत लोकसहभागातून जुन्या ग्रामपंचायत इमारतीचे नूतनीकरण केले. रंगरंगोटी व दुरुस्ती करून इमारतीला नवसंजीवनी देण्यात आली आणि त्यामध्ये अध्यापन कक्ष व वाचनालय सुरू करण्यात आले. याच इमारतीतील दुसऱ्या खोलीत महिला बचत गटांसाठी ग्रामसंघ कार्यालयाचीही स्थापना करण्यात आली आहे.

या वाचनालयाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ शासकीय अनुदानावर अवलंबून न राहता स्थानिक ग्रामपंचायतीच्या पुढाकारातून आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने हा उपक्रम साकारण्यात आला आहे.

जि.प. शाळेच्या माजी विद्यार्थ्याची अनोखी भेट

ग्रामपंचायतीने जुन्या इमारतीची दुरुस्ती करून वाचनालयासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या. मात्र स्पर्धा परीक्षांच्या पुस्तकांची कमतरता होती. ही बाब लक्षात घेऊन पिंडकेपार जिल्हा परिषद शाळेचे माजी विद्यार्थी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी अनिल हिरदीलाल पटले यांनी विविध स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त पुस्तके भेट देत वाचनालयाला मोलाचे योगदान दिले. त्यांच्या या उपक्रमामुळे गावातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी आवश्यक साहित्य उपलब्ध झाले आहे

## विदर्भातील शाळा २९ जूनपासून सुरु करा

विदर्भात यंदा उन्हाने अक्षरशः कहर केला आहे. अनेक ठिकाणी तापमान ४५ ते ४७ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले असून विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

याच पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे विदर्भातील शाळा १५ जूनऐवजी २९ जूनपासून सुरू करण्याची मागणी केली आहे.लहान विद्यार्थ्यांना उष्माघात, निर्जलीकरण, चक्कर येणे, डोकेदुखी यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. अनेक शाळांमध्ये थंड पाणी, सावली आणि इतर मूलभूत सुविधा अपुऱ्या असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत सकारात्मक भूमिका घेतल्याची माहिती समोर आली असून अंतिम निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# माओवाद्यांचा शस्त्रास्त्र निर्मिती कारखाना गडचिरोली पोलीस व नारायणपूर (छ.ग.) पोलीसांकडून नष्ट

**गडचिरोली :–** गडचिरोली पोलिसांच्या ङ्गऑपरेशन अंतिम प्रहारफ्अंतर्गत आठवडाभरात पुन्हा एक शस्त्रास्त्र निर्मिती कारखाना शोधून काढण्यात पोलिसांना यश आले. गडचिरोली पोलीस आणि छत्तीसगडच्या नारायणपूर जिल्ह्याच्या पोलिसांनी संयुक्तपणे राबविलेल्या या कारवाईत पाच वेगवेगळ्या बंदुकांसह १८ जीवंत काडतूसं, स्फोटकं आणि इतर बरेच साहित्य पोलिसांच्या हाती लागले. हे सर्व साहित्य जंगलात जमिनीखाली लपवून ठेवले होते हे विशेष.

माओवाद्यांनी छत्तीसगड आणि गडचिरोली जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात सुरक्षा दलांना धोका पोहोचविण्यासाठी, तसेच घातपाताच्या कारवाया करण्याच्या उद्देशाने विविध प्रकारची शस्त्रे आणि स्फोटक साहित्य लपवून ठेवले होते. दुर्गम जंगलाचा फायदा घेत माओवाद्यांकडून त्या ठिकाणी हिंसक कारवायांमध्ये वापरल्या



जाणाऱ्या शस्त्रांस्त्रांची निर्मिती केली जात होती. यापूर्वी २३ मे २०२६ रोजी केलेल्या कारवाईतही अशाच पद्धतीचे साहित्य पोलिसांच्या हाती लागले होते. त्यानंतर पुन्हा आत्मसमर्पित माओवाद्यांकडून मिळालेल्या टिपनुसार २७ मे २०२६ रोजी केलेल्या कारवाईत नारायणपूर जिल्ह्यातल्या काकूर पोलीस स्टेशनपासून अवघ्या ७ किलोमीटर अंतरावर हे साहित्य पोलिसांना आढळले.

या कारवाईसाठी पोलीस अधीक्षक एम.रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराज्यीय अभियान राबविण्यात आले. त्यात विशेष अभियान पथक प्राणहिता येथील ४ तुकड्या, डीआरजी नारायणपूरचे १ पथक आणि प्राणहिता येथील २ बॉम्ब शोधक–नाशक पथकाने प्रत्यक्ष सहभाग घेऊन सीमावर्ती भागातील जंगल पिंजून काढले.

या कारवाईत जमिनीखाली लपवून ठेवलेल्या बंदुका व काडतुसांसह क्लेमोर, डेटोनेटर, कॉर्टेक्स वायर, ५०० पेक्षा अधिक बिजीएल सेल व बिजीएल सेल बनविण्याचे साहित्य, ७ नग बिजीएल लाँचर, ३ नग ट्युब लाँचर, लोखंडी सळाखी, तसेच शस्त्रनिर्मितीसाठी लागणाऱ्या २ लेथ मशीन, २ मोटर, ग्राईडर मशीन, इन्व्हर्टर व बॅटरी, वायर बंडल, सोलर प्लेट असे शस्त्र व शस्त्रनिर्मिती साहित्य हस्तगत करण्यात यश आले. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली घटनास्थळावरुन मिळालेले शस्त्रनिर्मितीचे माओवादी साहित्य पथकातील जवानांकडून जागीच नष्ट करण्यात आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक एम.रमेश, अपर पोलीस अधीक्षक (अभियान) कार्तिक मधिरा, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) गोकुल राज जी., अपर पोलीस अधीक्षक (अहेरी) हर्षवर्धन बी.जे., पोलीस उपअधीक्षक (अभियान) विशाल नागरगोजे, पोलीस उपअधीक्षक (नारायणपूर) मनोज मंडावी यांच्या मार्गदर्शनाखाली जवानांनी यशस्वीरित्या पार पाडली.

# वृक्षधरा फाउंडेशनच्या ऑक्सिजन मॉस्क रॅलीने वेधले सर्वांचे लक्ष

## महामार्गालगत वृक्षारोपणाची मागणी : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजन

**गोंदिया :–** जागतिक पर्यावरणदिनानिमित्त वृक्षधरा फाउंडेशनच्या वतीने गोंदिया शहरात भव्य पर्यावरण जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत सहभागी युवकांनी ऑक्सिजन मॉक्स व डोक्यावर वृक्ष घेऊन शहरवासीयांचे लक्ष वेधले होते. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत नागपूर–गोंदिया–बालाघाट राष्ट्रीय महामार्गाच्या बांधकामादरम्यान तोडण्यात आलेल्या हजारो वृक्षांच्या बदल्यात तातडीने वृक्षारोपण करण्यात यावे, अशी मागणी या रॅलीच्या माध्यमातून केली.

जयस्तंभ चौक येथून सुरु झालेली ही रॅली गांधी प्रतिमा, मुख्य बाजार मार्गाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत काढण्यात आली. रॅलीत युवक, विद्यार्थी, पर्यावरणप्रेमी, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सहभागी नागरिकांनी हातात फलक, बॅनर व रोपे घेऊन पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला. झाडे वाचवा, भविष्य वाचवा, जिथे झाडे तोडली तिथे नवी झाडे लावा, पर्यावरण संरक्षण ही सर्वांची जबाबदारी अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. महामार्गाच्या दोन्ही वाजूंना किमान सहा फूट उंचीची देशी प्रजातींची झाडे लावावीत, वृक्षारोपणाच्या अंमलबजावणीबाबत सार्वजनिक करावी तसेच वृक्षारोपणाच्या देखरेखीसाठी विशेष समिती स्थापन करावी, अशा प्रमुख मागण्या यावेळी करण्यात आल्या. फाउंडेशनने यापूर्वी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, जिल्हाधिकारी आणि प्रशासनाकडे अनेकदा निवेदने दिल्याचे सांगितले. मागण्यांवर ठोस कार्यवाही न झाल्यास माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती मागविणे तसेच



आवश्यकतेनुसार कायदेशीर मार्गाचा अवलंब करण्याचा इशाराही देण्यात आला.

### पर्यावरण संर्वधनाची सामूहिक शपथ

रॅलीच्या समारोपावेळी उपस्थितांनी वृक्षारोपण, जलसंवर्धन, प्लास्टिकमुक्त जीवनशैली आणि पर्यावरण संरक्षणाची सामूहिक शपथ घेतली. आगामी काळात जिल्हाभर व्यापक वृक्षारोपण आणि जनजागृती अभियान राबविण्याची घोषणाही वृक्षधरा फाउंडेशनने केली. “आम्ही विकासाच्या विरोधात नाही, तर अनियोजित विकासाच्या विरोधात आहोत. झाडे लावणेच नव्हे तर ती जगविणेही आपले कर्तव्य आहे,” असा संदेश यावेळी देण्यात आला